आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
■ संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८



RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर   वर्ष ३४ वे   अंक १५१ वा मंगळवार, दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक)   पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26   पृष्ठे - ६   मो:९४२२४७२५०२   किंमत १ रुपया

## काँग्रेसच्या स्टेजवरून माझ्या आईला शिवी दिली, हा अपमान...; पंतप्रधान नरेंद्र मोदी झाले भावूक

**दरभंगा/वृत्तसंस्था : बिहारच्या दरभंगा येथे झालेल्या काँग्रेसच्या मतदार अधिकार यात्रेत पंतप्रधान मोदींना शिवीगाळ करण्यात आली होती. राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांच्या व्यासपीठावरून मोदींच्या आईचा अपमान करण्यात आला. त्यावरून आज नरेंद्र मोदी यांनी भावूक प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेस आणि राजदच्या व्यासपाठीवरून माझ्या आईला शिवीगाळ केली. हा अपमान फक्त माझ्या आईचा नाही, तर देशातील प्रत्येक आईचा, बहिणीचा आणि मुलींचा आहे असं मोदींनी म्हटलं.**



बिहारच्या महिलांना बचत गटाच्या माध्यमातून कमी दरात कर्ज उपलब्ध करणे, त्यांना आवश्यक डिजिटल सहकार्य करणे या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसच्या व्यासपाठीवरून झालेल्या शिवीगाळीचा उल्लेख केला. आईचा उल्लेख होताच ते भावूक झाले. भोजपुरी भाषेत त्यांनी बिहारमध्ये आईचं स्थान देवीदेवतांपेक्षा वरचं मानले जाते, माझ्या आईने गरिबी पाहिली आहे. आईचं आपलं जग असते, आईच आपला स्वाभिमान असतो. ही समृद्ध परंपरा असणाऱ्या बिहारमध्ये काही दिवसांपूर्वी जे घडले, त्याची मी कल्पनाही केली नव्हती, बिहारमधल्या जनतेनेही हा विचार केला नव्हता असं त्यांनी सांगितले.

बिहारमध्ये आरजेडी-काँग्रेस व्यासपाठीवरून माझ्या आईला शिवी देण्यात आली. ही शिवी फक्त माझ्या आईचा अपमान नाही तर देशातील आई, बहीण आणि मुलींचा अपमान आहे. हे पाहून आणि ऐकून बिहारच्या प्रत्येक आईला किती वाईट वाटले असेल याची मला जाणीव आहे. मला माहिती आहे, माझ्या हृदयात जे दुःख आहे तेच दुःख बिहारच्या लोकांनाही आहे. म्हणूनच आज जेव्हा मी इतक्या मोठ्या संख्येने बिहारच्या लाखो माता आणि भगिनींना पाहत आहे, आज मी माझ्या मनातील दुःख तुमच्यासोबत शेअर करत आहोत. जेणेकरून तुमच्या माता आणि भगिनींच्या आशीर्वादाने मी हे सहन करू शकेन अशी भावनिक प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.

दरम्यान, प्रत्येक आई आपल्या मुलाला मोठ्या तपस्येने सांभाळते, मुलांपेक्षा मोठं आईपुढे काहीच नसते. मी माझ्या आईला लहानपणापासून असेच पाहतोय. गरिबी आणि संकटाचा सामना करून माझ्या आईने आम्हा भावंडांना वाढवले. पाऊस पडायचा तेव्हा घरात छतातून पाणी गळू नये यासाठी ती मेहनत घ्यायची. स्वत: आजारी पडली तरी आम्हाला कळू द्यायची नाही. ती सतत काम करत राहायची. जर तिने एक दिवसही आराम केला तर मुलांना वेदना होतील हे तिला कळायचे. मुलांसाठी नवनवीन कपडे घ्यायची, स्वत: साडीही खरेदी करत नव्हती. देशातील कोट्यवधी आई असेच मुलांना सांभाळत असेल असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

## पोलिसांची आझाद मैदान रिकामे करण्याची नोटीस

### आम्ही मुंबई सोडणार नाही-मनोज जरांगे पाटील

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे पाटील यांना आणि त्यांच्याबरोबर आलेल्या आंदोलकांना आझाद मैदान परिसर रिक्त करण्याची नोटीस बजावली आहे. या नोटिशीनंतर मनोज जरांगे यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली आणि स्पष्ट केले की आमच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आम्ही मुंबई सोडणार नाही. तुम्ही आम्हाला तुरुंगात टाकल्यास आम्ही तुरुंगात बसून उपोषण करू.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, आम्ही लोकशाही मार्गाने, कायद्याच्या व न्यायदेवतेच्या चौकटीत राहून आंदोलन करत आहोत. आम्ही नियम मोडलेले नाहीत. आम्हा गरिबांना न्यायदेवतेकडून खूप आशा आहेत. आम्ही आमच्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करत आहोत. अशा काळात न्यायदेवता आमचा आधार बनेल. सरकार आम्हाला विचारत नाही, परंतु त्यांनी गोरगरिबांचा विचार केला तर त्यांना लोकांचा आशीर्वाद मिळेल. न्यायमंदिराने आमच्या वेदना पाहाव्यात. न्यायदेवता आमच्या वेदना जाणून घेईल अशी आम्हाला अपेक्षा आहे. आम्ही शांततेत व लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहोत. आम्ही कुठेही कायद्याचं उल्लंघन केलेलं नाही.

**शांततेच्या मार्गाने आमचे आंदोलन चालू राहील : मनोज जरांगे**

मराठा आरक्षणासाठी लढणारे जरांगे पाटील म्हणाले, काल रात्री न्यायालयाने आम्हाला काही सूचना केल्या. त्यानंतर काही तासांत आमच्या पोरांनी मुंबईच्या रस्त्यांवरील आपली वाहनं हटवली. आमच्यामुळे आता मुंबईत कुठेही वाहतूक कोंडी झालेली नाही. न्यायालयाच्या एका शब्दावर आम्ही मुंबई सुरळीत केली आहे. न्यायदेवता व पोलिसांना याहून अधिक काय हवं आहे? आम्ही यापुढेही न्यायदेवता सांगेल तसंच करू. नियम पाळत व शांततेत आमचं आंदोलन यापुढेही चालू राहील.

सरकारने आमच्याविरोधात न्यायालयात जाऊन, इकडे-तिकडे जाऊन कितीही प्रयत्न केले तरी मी सरकारला व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगतो की आमच्या सर्व मागण्या पूर्ण होत नाहीत तोवर आम्ही मुंबई सोडणार नाही. हैदराबाद गॅझेटियर, सातारा गॅझेटियरची अंमलबजावणी झाल्याशिवाय आम्ही परत जाणार नाही. मराठा व कुणबी एकच आहेत, यासंदर्भातील शासकीय अधिसूचना काढल्याशिवाय, सगेसोयऱ्यांबाबतच्या अधिसूचनेची अंमलबजावणी झाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही. तुम्हाला यात काही अडचणी येत असतील तर आम्हाला तसं सांगा. आम्ही त्यावरील उपाय सुचवू.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, मराठा व कुणबी एकच आहेत. याबाबतचा जीआर काढा. या आंदोलनादरम्यान आमच्या बांधवांवर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घ्या. आमच्यावर हल्ला करणाऱ्या पोलिसांना बडतर्फ करा. त्यांच्यावर कलम १२० ब आणि कलम ३०७ अंतर्गत गुन्हे दाखल करा. आंदोलनादरम्यान बलिदान देणाऱ्या आमच्या बांधवांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घ्या. आतापर्यंत ५८ लाख कुटुंबांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्या नोंदी त्या-त्या गावातील ग्रामपंचायत कार्यालयात चिकटवून संबंधितांना कुणबी जातप्रमाणपत्र वाटा. वैधता प्रमाणपत्र द्या. सरकारने माजी. न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या नेतृत्वाखालील समितीला मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे समितीने कुणबी नोंदी शोधण्याचं काम चालू ठेवावे.

## अजित पाटील कव्हेकरांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

### कैलास निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी अलोट गर्दी

**लातूर/प्रतिनिधी :** भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचा वाढदिवस धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यामध्ये रक्तदान शिबिर, शैक्षणिक साहित्य वाटप, रुग्णांना फळे वाटप, अन्नदान, गोशाळेस चारा वाटप यासह विविध देवस्थानांमध्ये अभिषेक व महाआरती करण्यात आली. अजित पाटील कव्हेकर यांना शुभेच्छा देण्यासाठी कैलास निवासस्थानी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह राजकीय क्षेत्रातील पदाधिकाजयांनी अलोट गर्दी केली होती.



भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सिध्देश्वर मंडलाच्या वतीने ग्रामदैवत श्री सिध्देश्वरास अभिषेक करून महाआरती करण्यात आली. तसेच सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेल्या सुरत शहावली दर्गास चादर अर्पण करून अजित पाटील कव्हेकर यांच्या निरोगी व दिर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. त्याचबरोबर विविध भागामध्ये वृक्षारोपणही करण्यात आले. महात्मा बस्वेश्वर मंडलाच्या वतीने गोलाई येथील श्री जगदंबा देवीची महाआरती करून प्रार्थना करण्यात आली. अजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते बाजार समितीत असलेल्या गौरीशंकर मंदीरात अभिषेक करून महाआरती करण्यात आली. तसेच कव्हा येथे शेखमियाँ साहेब दर्गास चादर अर्पण करण्यात आली. रणंजित पाटील कव्हेकर व रागिनी यादव यांच्या उपस्थितीत रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. तसेच मातोश्री वृध्दाश्रमासह शासकीय रुग्णालयात अन्नदान करण्यात आले.शहरातील विविध शाळांमध्ये गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.त्याचबरोबर मजगेनगर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात सौ. अदिती पाटील कव्हेकर यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने रक्तदान केले. अजित पाटील कव्हेकर यांना शुभेच्छा देण्यासाठी कैलास निवासस्थानी सकाळपासूनच अलोट गर्दी करण्यात आली होती. शुभेच्छा देणाजयांमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरासंह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील अनेकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली होती. शहरातील विविध व्यापारी व उद्योजकांनी अजित पाटील कव्हेकर यांची भेट घेवून त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

**राजकीय मान्यवरांनी दिल्या शुभेच्छा**

भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांना वाढदिवसानिमित्त जिल्ह्यासह राज्यातील अनेक राजकीय मान्यवरांनी दूरध्वनीवरून शुभेच्छा देवून त्यांच्या पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. यामध्ये प्रामुख्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. रमेश कराड, आ. अभिमन्यू पवार, लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह आदींचा समावेश होता.

## विद्युत सहायकपदाच्या उमेदवारांना मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी शेवटची संधी

**लातूर/प्रतिनिधी :** महावितरणमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी दि. २० ते २२ ऑगस्टला पूर्ण झाली आहे. तथापि राज्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच इतर कारणांमुळे गैरहजर असलेल्या काही उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दि. ९ व १० सप्टेंबरला शेवटची संधी देण्यात आली आहे. महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेले उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात आली आहे. मात्र या तीनही दिवसांत राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे निवड झालेल्या ज्या उमेदवारांना उपस्थित राहता आले नाही, अशा काही गैरहजर उमेदवारांना मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी आणखी एक संधी देण्यात आली आहे.

त्यानुसार आता दि. ९ व १० सप्टेंबरला गैरहजर उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे, प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे. सकाळी १० वाजता ही कार्यवाही सुरू होईल. त्यासाठी संबंधित उमेदवारांनी स्वतः सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह हजर राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार आणखी एक संधी देऊनही कागदपत्रांच्या पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल व भविष्यात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या छाननी व पडताळणीमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या जे उमेदवार पात्र होतील त्यांच्या नियुक्तीबाबत संबंधित परिमंडलांमध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची माहिती महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**महावितरणकडून ९ व १० सप्टेंबरला पडताळणी**

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



मराठा आरक्षण संदर्भात शासन GR काढण्याच्या तयारीत?...





डॉल्बीमुक्तीमुळे अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे ! चांगल्या बाबी स्वीकारल्याने गणेशभक्तांचे अभिनंदन होत आहे !!

## उदगीर तालुक्यातील मटका गँग लातूर जिल्ह्यातून तडीपार (हद्दपार)

### अवैध धंद्यांशी निगडित व्यक्तींवर कठोर कारवाईचे पोलीस अधीक्षकांचे आदेश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात वेळोवेळी मोहीम राबवून अवैध धंदे करणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येत आहे.

लातूर जिल्ह्यातील मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या लोकाविरुद्ध मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल करून मटका जुगार चालवणाऱ्या वर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. परंतु काही मटका जुगार चालविणाऱ्यांवर वेळोवेळी गुन्हे दाखल करून व प्रतिबंधात्मक कार्यवाही करूनही त्यांच्यात काहीच सुधारणा होत नाही. ते लपूनछपून मटका जुगार चालवीत असताना परत मिळून आले. त्यांच्या अशा कृत्यामुळे समाजातील गोरगरीब जनता, मजदूर वर्ग झटपट पैसे कमविण्याच्या आमिषाला बळी पडत आहेत. जुगारांमध्ये पैसे हारल्याने त्यांच्या कौटुंबिक जीवनावर व मानसिकतेवर विपरीत परिणाम होऊन अनेक जनामध्ये नैराश्य निर्माण होऊन ते व्यसनाधीन होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

काही मटका जुगार चालविणारे लोक त्यांच्यावर वारंवार गुन्हे दाखल होऊनही व प्रतिबंधात्मक कार्यवाही करूनही परत लपून-छपून मटका जुगार चालवीत आहेत त्यांच्या वर्तनामध्ये काहीच फरक पडत नाही याची गंभीर दखल घेऊन मा. पोलीस अधीक्षक लातूर यांनी जिल्ह्यातील मटका जुगार चालवणाऱ्या वर हद्दपारची कार्यवाही करण्याकरिता ठाणे प्रभारींना आदेशित केले होते. त्यावरून उदगीर तालुक्यातील वाढवणा पोलीस ठाणे हद्दीतील मटका जुगार चालवणाऱ्या इसमाविरुद्ध हद्दपारचा सविस्तर प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी उदगीर सुशांत शिंदे यांच्याकडे पाठविला होता.



त्यावर नमूद प्रकरणाची सुनावणी होऊन उपविभागीय दंडाधिकारी यांनी खालील नमूद अनुक्रमांक एक ते दोन यांना तीन महिन्यासाठी तर अनुक्रमांक तीन ते आठ यांना दोन महिन्यासाठी लातूर जिल्ह्यातून तडीपार (हद्दपार) ची कार्यवाही केली आहे. पोलिसाकडून समजले की, १) अहमद सुरज शेख रा. वाढवणा बु. ता.उदगीर, २) सोहेल मुजमील शेख रा.हाळी ता.उदगीर, ३) क्रांतीकुमार शिवाजी जोंधळे रा. वाढवणा बु. ता.उदगीर, ४)विक्रम विनोद शिंदे रा.हाळी ता.उदगीर, ५) फिरोज चॉंदसाब शेख रा. वाढवणा ता. उदगीर, ६) अजय अनिल कज्जेवाड रा. वाढवणा बु.ता.उदगीर, ७) अलिम आयुबसाब डांगे रा. वाढवणा बु. ता.उदगीर, ८) तुकाराम रामकिशन पुंड रा. वाढवणा बु.ता.उदगीर नमूद इसमाना लातूर जिल्ह्याच्या बाहेर नेऊन सोडण्यात आले आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर कल्याणकर यांचे मार्गदर्शनात वाढवणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.एस गायकवाड यांनी नमूद लोकाविरुद्ध सविस्तर हद्दपार प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी उदगीर यांच्याकडे पाठविले होते.त्याचा पाठपुरावा उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले व वाढवना पोलीस ठाण्याचे सपोनि सुनील गायकवाड यांनी केला त्यावर सदर प्रस्तावांचे अवलोक व सुनावणीअंती उपविभागीय दंडाधिकारी उदगीर सुशांत शिंदे यांनी नमुद लोकाविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५७ प्रमाणे कार्यवाही करून त्यांना लातूर जिल्ह्यातून तडीपार (हद्दपार) केले आहे.

सदर कारवाईच्या माध्यमातून अवैध धंदे चालविणारे लोकांना लातूर जिल्ह्यातून तडीपार (हद्दपार) केल्यामुळे अवैध धंद्यांना प्रतिबंध बसणार असून अवैध धंदे करणाऱ्यांना चांगलाच दणका बसला असून अवैध धंदे करणाऱ्यांना चांगला जरब बसणार आहे.

## हडपसर-काजीपेट एक्सप्रेसमध्ये २ अतिरिक्त कोच कायमस्वरूपी जोडणार



**सोलापूर/प्रतिनिधी :** रेल्वेने खाली दिलेल्या तपशीलांनुसार हडपसर-काजीपेट एक्सप्रेसमध्ये २ अतिरिक्त कोच म्हणजेच १-एसी-II टियर आणि १-एसी-III टियर असे २ कोच कायमस्वरूपी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे:

- ट्रेन क्रमांक १७०१४ काजीपेट-हडपसर एक्सप्रेस मध्ये ०१.०९.२०२५ पासून लागू
- ट्रेन क्रमांक १७०१३ हडपसर-काजीपेट एक्सप्रेस मध्ये ०२.०९.२०२५ पासून लागू

सुधारित रचना: २ एसी-II टियर, ५ एसी-III टियर, ११ स्लीपर क्लास, २ सामान वाहू कोच सह ब्रेक व्हॅन मिळून ६ सामान्य द्वितीय श्रेणी (२४ कोच)

प्रवाशांनी कृपया नोंद घ्यावी आणि सुविधांचा लाभ घ्यावा अशी विनंती आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## गणपती उत्सव सार्थक व्हावा

भारतीय संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ आहे. कोठेही नाही तेवढे सण भारतात विविध प्रांतात साजरे केले जातात. विविधतेतून एकता दर्शविली जाते. जेवढे प्रांत भारतात आहेत तेथे भिन्न सण साजरे केले जातात. त्यामुळे विविध संस्कृतीचे दर्शन घडले जाते. मुळात भारतात भिन्न सण-उत्सव असले तरी यातून काही संदेश दिला जातो. विनाकारण म्हणजे कारण नसताना सण-उत्सव साजरे केले जात नाहीत. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. प्रत्येक सणाच काही तरी लोकोपयोगी बाब आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कारण आपण ईतिहास जाणून घेत नाहीत. म्हणून पारंपारिक पद्धतीने सण-उत्सव साजरे करीत आहोत. आता सध्याला सण जो चालू आहे त्याचा विचार केला तर गणपती उत्सव महाराष्ट्रात घरोघरी साजरा केला जात आहे. हा सार्वजनिक उत्सव घराघरात पुर्वी होता तो सार्वजनिक झाला. लोकमान्य टिळकांनी या बाबत पुढाकार घेतला. भारतीय सण-उत्सवात ब्रिटीशांचा विरोध किंवा बंदी नव्हती. बंदी घातली तर उद्रेक होईल व असंतोष माजेल. ब्रिटीशांचा मुळ उद्देश भारताला लुटणे हा आहे तो साध्य होणार नाही हे ब्रिटीशांनी ओळखून अनेक जाती, मत-पंथाच्या समाजातील सणावर बंदी आणली नव्हती. याचाच लाभ लोकमान्य टिळकांनी घेतला व सार्वजनिक गणेश उत्सव जनजागृतीसाठी केला गेला. यातून राष्ट्रप्रेम जागृत केले. स्वराज्य माझ्या जन्म सिद्ध हक्क आहे तो मी मागणारच अशी सिंह गर्जना केली. याला जनतेनी साथ दिली. पुण्यात गणेशउत्सवाच्या काळात त्यांनी लोक जागृती करण्याचे काम केले. लोकांत देशप्रेम निर्माण करण्याचे काम केले. गणेशसमोर भाषणे केली, ती भाषणे ही राष्ट्रीय विचाराची होती. यातून भारतीय पेटून उठत होते. त्यामुळे भारतीयात राष्ट्रीय विचाराची भावना निर्माण झाली. लोक देशासाठी मरण्यास तयार झाले. स्वराज्य मागण्यात सुरवात केली. लोकजागृतीचे माध्यम म्हणून हा उत्सव पाहिला जातो. लोकसमुहात मोठी ताकद असते हे त्यांनी दाखवुन दिले. तमाम भारतीय स्वराज्य मागत आहेत याची भिती ब्रिटीशांच्यामनात बसू लागली. त्यामुळे गणपती उत्सवावर बंदी घालण्याबाबत विचार सुरू होता. भारतीय नेते जे स्वातंत्र्याच्या व स्वातंत्र्यपुर्वीचे होते त्यांना केवळ राष्ट्रहीतच दिसून येत होते. बाकी त्यांना देणे-घेणे काही नव्हते. आलिकडील नेते मंडळी व स्वातंत्र्याच्या काळातील नेते मंडळी यात मोठा फरक दिसून येतो. कारण पुर्वी स्वराज्य हाच हेतू व नंतर स्वराज्य सुराज्या निर्मितीकडे लक्ष अपेक्षित होते. ते दिसून येत नाही. आज स्वराज्यात ब्रिटींशांनी व स्वार्थी मंडळींनी जो जातीयवाद पेरला तोच फोफावत आहे. जातीयवाद वाढत आहे. धर्माची शिकवण विसरली जात आहे. मांस खाणे म्हणजे हिंसा करणे. एखाद्या आत्म्याचा बळी देणे हाच होतो. मानवाचे भोजन मांसाहार नाही. हिंस्त्र प्राण्याचे भक्ष्यण हा मांसाहार आहे त्यामुळे ईश्वराने माणूस व प्राण्यामध्ये शरिर रचना भिन्न केली आहे. आताडी प्राण्याचे लांब आहेत. जीभ लांब आहे. शरिररचना भिन्न असली तरी सणा-उत्सवाच्या माध्यमातून हिंसा घडविली जाते. बकरे आदि कापले जातात याला कोठेतरी पायबंद घातला पाहिजे. मुळात कोणताही धर्म, धार्मिक विचार हे हिंसा शिकवत नाही. हिंदुचे वैदिक विचार तर मानवतेचे आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. काही झाले तरी विचार प्रत्येक बाबीचा केला पाहिजे. आता सध्याला चालू सण हा गणेश उत्सवाचा आहे. दहा दिवस सेवा केली जाते. यातून काय घ्यावे याचा विचार केला पाहिजे. मुळात उत्सवाचे बदलते स्वरूप चिंताजनक आहेत. कारण उत्सवात वर्गणी गोळा करणे, लाईटींग व स्पिरक लावणे हेच दिसून येते. सामाजिक उपक्रमाची मोठी गरज आहे. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य मागण्याची शक्ती निर्माण केली. जागृती केली. आता आपण स्वतंत्र झालो आहोत. लोकशाही भोगत आहोत. अशा लोकशाहीत लोककल्याणाचा विचार सण-उत्सवातून झाला पाहिजे. तो होत नाही. काही ठिकाणी आरोग्य व रक्तदान शिबीर होतात बाकी काही दिसून येत नाही. प्रत्येक गल्लीत गणपतीची स्थापना झालेली आहे. त्यामुळे आपल्या गल्लीत कोणी गरीब असले त्यांना मदत केली पाहिजे. गरीबांची मुलगी असेल तील शिक्षणोपयोगी साहित्य दिले पाहिजे. शाळेत जाण्यासाठी सायकल घेवुन दिली पाहिजे. एखादी विधवा असेल तील शिलाईमशीनची मदत केली पाहिजे. कुटीरउद्योग म्हणजे पापड तयार करण्याची मशिन, पिठाची चक्की दिली पाहिजे. काही तरी सामाजिक उपक्रम राबविला पाहिजे. लोकमान्य टिळक यांच्या सारखा त्याग करू शकत नाही आता त्याची गरज नाही. आता स्वराज्याचे सुराज्य करण्याची गरज आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे. सामाजिक कार्यातूनच देशासाठी चांगले करता येवू शकते. त्याच प्रमाणे अशक्य असे काही नाही. लोकवर्गणी ही लोकासाठी, जे गरीब आहेत त्यांच्यासाठीच खर्च केली पाहिजे. एकट्यापेक्षा गल्लीतून लोकसहभागतून अनेक सामाजिक उपक्रम राबवु शकतोत. मंदीराची उभारणी, बांधकाम, गल्लीत रस्ता तयार करू शकतोत. अनेक सामाजिक कार्य यातून घडू शकते. केवळ तसे करण्याची मानसिकता व तयारीची गरज आहे. त्यामुळे जे लोकमान्य टिळकांनी करून दाखविले, स्वराज्य मागण्याची हिंमत निर्माण केली हे सतत लक्षात ठेवले पाहिजे. आपणांस आपल्यासमाजाकडून मदत घेवुन चांगल्या उपक्रमासाठी खर्च केली पाहिजे. देखावे मर्यादित असावे. लाईटींग कमी असावे. वर्गणीदेण्यात कोणी मागे नाही. आपल्या आर्थिक ताकदीनुसार वर्गणी देतात. कोणीही नाही म्हणत नाही. आपणच चांगले सामाजिक कार्यसाठी कमी पडतो. त्यामुळे अजून वेळ गेलेली नाही. सामाजिक उपक्रमाने गणेश उत्सव साजरा करावा. हा सण दिर्घकाळ व आंनदाचा आहे. लहानापासून मोठ्या वृद्धापर्यंत मनोभावे साजरा करतात. त्यामुळे सामाजिक दृष्टिकोनातून सण-उत्सव यापुढेही साजरे केले पाहिजेत.

# व्यवसायातून उन्नती साधूया.. जीवनाचा उत्कर्ष घडवूया

राज्यातील युवक-युवतींमध्ये असलेल्या प्रचंड क्षमतेला दिशा देण्यासाठी व स्वप्नांना वास्तवात आणण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. समाजातील मागास घटक, बेरोजगार युवक-युवती यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन देऊन विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात येत असून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात येत आहेत.

युवकांच्या हाताला रोजगार दिला तर ते इतरांसाठीही रोजगार निर्माण करतील. याच विचाराने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ कार्यरत आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी व उद्योग-व्यवसायात तरुणांना संधी देण्यासाठी या महामंडळामार्फत विविध योजना राबविल्या जातात.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील एक महत्त्वाचे महामंडळ आहे. हे महामंडळ प्रामुख्याने मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तरुणांना आर्थिक सहाय्य पुरवून त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. या महामंडळाची स्थापना २७ नोव्हेंबर १९९८ रोजी मराठा समाजातील बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत अल्प व्याजदर कर्ज सुविधा, अनुदानावर आधारित आर्थिक योजना, प्रशिक्षण कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन आणि तरुणांसाठी व्यवसाय योजना अशा आर्थिक विकासाच्या योजना राबवल्या जातात. या योजनांचा मुख्य उद्देश मराठा समाजातील तरुणांना व्यवसायासाठी लागणारी भांडवली मदत पुरवून त्यांना स्वावलंबी बनवणे. यामुळे अनेक तरुणांनी स्वतःचे उद्योग सुरू केले आहेत. या महामंडळाच्या मदतीमुळे ग्रामीण भागातसुद्धा उद्योजकतेचा विकास होताना दिसत आहे.

**अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांसाठी राज्य शासनाने अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात ३०० कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. नियोजन विभागाने याबाबतचा शासन निर्णय १५ जुलै २०२५ रोजी निर्गमित केला आहे.

या महामंडळा मार्फत वैयक्तिक कर्ज आणि गट कर्ज व्याज परतावा या योजना राबवल्या जातात.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना**(IR-I)

या योजनेअंतर्गत राज्यातील कोणत्याही बँकेमार्फत १५ लाख रुपयाच्या मर्यादेत कोणत्याही व्यवसाय / उद्योगाकरीता लाभार्थ्यांनी कर्ज घेतल्यास, त्या कर्जावरील व्याज परतावा जास्तीत-जास्त ७ वर्षाकरीता, १२ टक्केंच्या कर्ज दर मर्यादेत अथवा ४.५ लाख रुपये रक्कमेच्या मर्यादेत देण्यात येतो. २ फेब्रुवारी २०१८ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण निर्माण झालेले पात्रता प्रमाणपत्र (LOI) १,८९,३१८ तर एकूण बँक कर्ज मंजुरी लाभार्थी संख्या १,५३,७२६ असून

बँकांनी वितरित केलेली कर्ज मंजूर रक्कम १३,१६९.९९ कोटी आहे.

व्याज परतावा सुरु झालेली लाभार्थी संख्या (उश्ररळा) १,७५,८३६ असून

व्याज परतावा झालेली रक्कम १,३६१.५८ कोटी रुपये आहे.

**गट कर्ज व्याज परतावा योजना** (IR-II)

या योजनेअंतर्गत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन, दोन व्यक्तींसाठी कमाल २५ लाख रुपयाच्या मर्यादेवर, तीन व्यक्तींसाठी ३५ लाखाच्या मर्यादेवर, चार व्यक्तींसाठी ४५ लाखाच्या मर्यादेवर व पाच व पाच पेक्षा अधिक व्यक्ती असल्यास ५० लाखापर्यंतच्या व्यवसाय / उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याज किंवा १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हफ्ते भरल्यास, हफ्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम गटाच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. या योजनेमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO) गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरीता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल. २ फेब्रुवारी २०१८ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण निर्माण झालेले पात्रता प्रमाणपत्र (LOI) १०१४ असून एकूण बँक कर्ज मंजुरी लाभार्थी गट संख्या ९६९ आहे. एकूण बँकेने वितरित केलेली कर्ज मंजूर रक्कम ३६१.८७ कोटी आहे.

व्याज परतावा सुरु झालेली लाभार्थी संख्या (Claim) ५८९ आहे. व्याज परतावा झालेली रक्कम ३४.०३ कोटी आहे.

**गट प्रकल्प कर्ज योजना** (GL-I):

FPC (Farmer Producer Company) गटांना १० लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज उद्योगासाठी देण्यात येते व ७ वर्षे वसुली करण्यात येते. सद्यस्थितीत गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I) ही गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. महामंडळामार्फत २९ ऑगस्ट २०२५ पर्यंत लाभार्थ्यांना व लाभार्थी गटांना एकूण १,३९८.९६ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

**महामंडळाच्या योजनांकरिता अटी व शर्ती**

उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. अर्जदाराचे वय १८ ते ६० वर्षांच्या दरम्यान असावे. लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे. (जे ८ लाखाच्या मर्यादेत असल्याचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र) किंवा वैयक्तीक I.T.R. (पती व पत्नीचे) लाभार्थ्यांने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक / कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल. दिव्यांग व्यक्तीला योजनेअंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एल.एल.पी. कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय / उद्योगाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येईल व या योजनांची अंमलबजावणी तंतोतंत शासन निर्णय क्र. अपाम २०१७/प्र.क्र.१८९/ रोस्वरो-१, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ नुसार करण्यात येईल.

**योजनांचा लाभ घेण्यासाठी कार्यपध्दती**

महामंडळाकडून 'Letter of Intent (LOI) काढण्यासाठी खालील कागदपत्रे लागतात. ही कागदपत्रे ऑनलाइन अर्ज करताना अपलोड करावी लागतात.

पात्रता प्रमाणपत्र (LOI) करीता महत्वाची कागदपत्रे :

१. आधार कार्ड (अपडेटेड मोबाइल क्रमांक व स्वतःचा ई-मेल आयडीसह)

२. रहिवासी पुरावा (रहिवासी दाखला / लाईट बिल / रेशनकार्ड / गॅस बिल / बँक बुक)

३. उत्पन्नाचा पुरावा

(उत्पन्नाचा दाखला / आयकर रिटर्न जर लग्न झाले असल्यास, नवरा-बायकोचे व लग्न न झालेल्या सदस्यांचे स्वतःचे आयकर रिटर्न आवश्यक)

४. जातीचा पुरावा, शाळा सोडल्याचा दाखला/त्र्क्षपशीरश्र ठशसळींशी उतारा नंबर १ किंवा जातीचा दाखला.

५. लग्न झालेल्या महिलांसाठी Pan Card / Marriage Certificate / गॅझेट आवश्यक.

६. एक पानी प्रकल्प अहवाल (वेब प्रणलीवर उपलब्ध आहे)

७. स्वतः घोषणापत्र (वेब प्रणलीवर उपलब्ध आहे)

(जर आधार कार्ड व शाळा सोडल्याचा दाखला यामधील जन्म तारखे मध्ये तफावत असल्यास)

ही कागदपत्रे अपलोड करताना त्यांची स्कॅन केलेली प्रत स्पष्ट आणि वाचण्यायोग्य असावी. अर्ज करताना तुम्हाला https://udyog.mahaswayam.gov.in या वेबसाइटवर नोंदणी करून अर्ज भरावा लागतो. यानंतर तुम्हाला 'ङजख' मिळते, जे बँकेत कर्ज मंजुरीसाठी सादर करावे लागते.

तुम्ही कोणत्या योजनेसाठी अर्ज करत आहात (वैयक्तिक किंवा गट) त्यानुसार काही कागदपत्रे बदलू शकतात. अधिकृत आणि अचूक माहितीसाठी, महामंडळाच्या वेबसाइटला भेट देणे किंवा जवळच्या जिल्हा कार्यालयात संपर्क साधावा.

**अर्ज प्रक्रिया**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला https://udyog.mahaswayam.gov.in या अधिकृत वेबसाइटवर नोंदणी करून अर्ज करावा. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराला ऑनलाइन अर्ज करून 'Letter of Intent (LOI)' घेणे आवश्यक आहे. पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झाल्यानंतर ङजख समवेत लाभार्थ्यांने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा / उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे. कर्ज मंजूरीची पुर्ण प्रक्रीया बँक त्यांच्या नियमानुसार करीत असते, यामध्ये महामंडळ कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करीत नाही. कर्ज प्रकरण दाखल केल्यानंतर पोचपावती बँकेकडून घ्यावी. बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेब प्रणालीवर करावी. (उदा. ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक EMI वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा (बँक स्टेटमेंट). त्यानंतर बँकेमध्ये पुर्ण एचख हफ्ता भरल्यानंतरच महामंडळाच्या वेब प्रणालीवर ऑनलाईन क्लेम दाखल करावा. लाभार्थ्यांने एचख विहित कालमर्यादेत भरला असेल तरच त्याला व्याज परताव्याचा लाभ देता येईल. यामध्ये हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा म्हणून बँक स्टेटमेंट अपलोड करणे अनिवार्य असेल. लाभार्थ्याने दाखल केलेल्या क्लेमची पडताळणी महामंडळामार्फत करण्यात येऊन, लाभार्थ्यांस अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात ऑनलाईन स्वरुपात वितरीत करण्यात येईल. या योजनांच्या लाभाकरीता कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांना संपर्क साधावा. जिल्हा समन्वयकांचा संपर्क वेब प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या योजनांच्या सहाय्याकरिता महामंडळाचे मुंबई मुख्यालय व जिल्हा निहाय जिल्हा समन्वयकांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्याही खाजगी व्यक्ती / संस्थेच्या आमीषाला बळी पडू नये.

या महामंडळाच्यावतीने तरुणांना व उद्योजकांना स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी केवळ भांडवली मदतच नव्हे तर सर्वांगीण मार्गदर्शन आणि आवश्यक प्रशिक्षणाचीही सुविधा उपलब्ध करून दिली जाते. महामंडळाच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत राज्यातील हजारो तरुणांनी व्यवसाय, सेवा क्षेत्र, उत्पादन उद्योग, लघु व मध्यम उद्योग, तसेच शेतीपूरक व्यवसाय यांसारख्या विविध क्षेत्रांत स्वतःचा ठसा उमटवला आहे. या तरुणांनी उभारलेल्या उद्योगधंद्यांमुळे केवळ स्वतःचा रोजगार निर्माण झाला नाही, तर इतर अनेकांना देखील रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

राज्य शासनाच्या धोरणांतर्गत महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या या योजना ही फक्त लाभार्थ्यांच्या हितासाठी नसून महाराष्ट्राच्या भविष्याच्या पायाभरणीसाठी टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. ग्रामीण व शहरी भागातील युवकांना संधी देऊन त्यांना स्वावलंबनाच्या मार्गावर उभे करण्याचे कार्य या माध्यमातून होत आहे. या योजना ही केवळ आर्थिक मदत पुरवणारी नसून, आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि मराठा समाजातील घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी एक प्रभावी साधन ठरल्या आहेत.

**-शैलजा पाटील**
**विभागीय संपर्क अधिकारी.**

# गणेशोत्सव

गणपती बाप्पा म्हटले की आपल्या सर्वांच्या डोळ्यांसमोर अगदी लहान मुलांपासून ते आज्जी आजोबा पर्यंत सर्वांचे लाडके आराध्य दैवत असलेली उंदीरमामावर विराजमान झालेली, गोलगरगरीत तुंदिलतनू सावरणारी, सुपासारखे मोठ्ठे मोठ्ठे कान, एकदंत, छोटे पण तेजस्वी डोळे, एका हातात मोदक,दुसऱ्या हातात खडग, तिसऱ्या हातात परशु तर चौथा हात भरभरून आशीर्वाद देणारी, सुंदर, कोटी सूर्यां इतकी तेजस्वी मूर्ती साकारते .सर्वांचा अगदी जवळचा,आपला वाटणारा हा बाप्पा! सर्व देवांपेक्षा वेगळा दिसणारा, तरीही सुंदर वाटणारा असा हा बाप्पा. हा एकदंत, वक्रतुंड, पिंगाक्ष, गजवक्र, लंबोदर,विनायक, राजेंद्र, भालचंद्र ...अशा असंख्य नावानी ओळखला जातो. त्याची माहिती, कथा आपण जाणून घेऊच पण त्यापूर्वी 'गणेश जयंती ' आणि 'गणेश चतुर्थी '

**या दोन दिवसात काय विशेषता आहे हे जाणून घेऊ .**

गणेश जयंतीला बाप्पांचा जन्म झाला होता असे मानले जाते तर संकष्टी चतुर्थीला, गणेश चतुर्थीला गणपती बाप्पा कैलासावरुन पृथ्वीवर अवतरले असे मानले जाते. म्हणूनच या दोन्ही दिवसांना भारतीय संस्कृतीत धार्मिक दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे.

गणेश जयंती माघ शुक्ल चतुर्थीला साजरी केली जाते तर गणेश चतुर्थी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला साजरी करतात. दोन्ही दिवस गणपतीच्या जन्मोत्सव म्हणुनच मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

गणेश जयंतीच्या दिवशी अनेक ठिकाणी गणेश याग केले जातात. मोठ्ठा यज्ञ करून त्यात तूप, लाह्या यांची आहुती देऊन गणपती मंत्र व अथर्वशीर्षाची सहस्त्र आवर्तने ब्राह्मणांच्या कडून केली जातात. त्याला लाल रंगाची फुले आवडतात, दुर्वा आवडतात. म्हणून त्यांचा हार करून घातला जातो. त्याला मंदार, अनंत जास्वंद,पारीजातक यांची फुले खुप प्रिय आहेत तर शमीची पाने, बेल, आघाडा, दुर्वा यासारखी पानेही खुप आवडतात. मोदक, लाडू हे गणपती बाप्पांचे आवडते खाद्य!त याचा नैवेद्य दाखवून प्रसाद वाटला जातो आणि मनोभावे नमस्कार करून प्रार्थना च प्रसन्न होतो आणि यश, कीर्ती, बुद्धी, बुद्धी, प्रगती, ऐश्वर्य, सुख, शांती यांचा लाभ होतो अशी भक्तांची श्रद्धा आहे.

गणपती हा भगवान शंकर आणि पार्वती यांचा मुलगा. कैलासावर शंकर आणि पार्वती रहात असताना शंकर काही कारणास्तव बाहेर गेले होते. पार्वतीने तिच्या सोबतीसाठी, संरक्षणाच्या साठी म्हणून तिच्या अंगावरील हळदी पासून एक लहान बाळाची सुंदर मूर्ती बनवली.

तिच्यात फुंकर मारून सजीव केले. आणि तो इतका सुन्दर होता की तिने त्याला आपला पुत्रच मानले . एकदा तीला स्नानाला जायचे होते. आजूबाजूला कोणीच दिसत नव्हते म्हणून तिने गणपतीला दरवाजापाशी खेळत लक्ष ठेवण्यास सांगितले. आणि कोणीही आले तरी त्यांना आतमध्ये सोडू नकोस असे बजावले. तो आईचा आज्ञाधारक पुत्र !

थोडयांच वेळात नेमके साक्षात शंकर घरी परत आले. पार्वतीला भेटण्यासाठी लगबगीने आतजाऊ लागले तेंव्हा गणेशाने त्यांना अडवले. शंकरांनी खुप समजावून पाहिले, त्यांचे वाहन असलेल्या नंदीने पण खुप समजावले, पण गणपती त्यांचे ऐकायला तयारच नव्हते . शेवटी शंकरांना इतका राग आला की त्यांनी रागारागात त्रिशुळाने त्यांचे मस्तक कापले. ते खूपच दुरवर जाऊन दिसेनासे झाले. थोड्याच वेळात पार्वती बाहेर आली . तिने हे सारे पाहिले आणि ती अतिशय संतापली. माझ्या पुत्राला ठार मारण्याचे धाडस कसे केले, म्हणून आक्रोश करू लागली. शंकरांना सर्व लक्षात आल्यावर चुक समजली ,त्यांनी तिची माफीही मागितली पण ती ऐकायला तयारच नव्हती. तो निष्पाप जीव माझ्या आज्ञेचे पालन करत होता, त्याची काहीही चुक नसताना त्याला शिक्षा झाली, आता काहीही करून तो जिवंत करा असे म्हटल्यावर शंकरांनी त्यांच्या सेवकांना आजूबाजूला तो सजीव दिसेल त्याचे मस्तक आणा असा आदेश दिला. त्यावेळी सेवकांना जंगलात एक बालहत्ती दिसला. त्यांनी त्याचे मस्तक शंकरांना आणून दिले. त्यांनी ते धडावर ठेवले आणि त्यात प्राण फुंकले. आणि त्याला पुन्हा जिवंत केले . म्हणून गणपतीचे मस्तक गजासारखे आहे. त्यामुळेच त्यांना गजानन म्हणूनहि ओळखू लागले. त्याला बुद्धीची देवता म्हणून ओळखले जाईल,घरोघरी त्याची मूर्ती स्थापन करून पूजा केली जाईल आणि सर्व मंगल प्रसंगी सर्व देवतांच्या आधी त्याचे पूजन केले जाईल असा आशीर्वाद सुद्धा दिला. म्हणूनच कोणत्याही शुभ प्रसंगाची सुरुवात आपण गणेशपूजनानेच करतो . त्याची पूजा करून कोणत्याही कार्याचा शुभारंभ केला की कार्यात कोणतेही अडथळे येत नाहीत आणि कार्य निर्विघ्नपणे पार पडते .भक्तांवरकोणतेही संकट येत नाही .

पूर्वी गणेश चतुर्थीला म्हणजेच भाद्रपद मासात समाजात एकी निर्माण व्हावी, लोकांचा आनंद आणि उत्साह वाढावा म्हणून लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी हा उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. गावात गणपतीची उत्सव मूर्ती बसवून त्याची प्रतिस्थापना आणि पुजा करून सर्व लोकांना एकत्र जमवून विचारांची देवाण घेवाण केली जायची ,मूर्तीची मनोभावे पूजा करून नैवेद्य दाखवला जायचा, प्रसाद वाटला जायचा आणि अनंतचतुर्दशीला या मूर्तीचे जड अंत:करणाने विसर्जन केले जायचे . आजही त्यांनी सुरु केलेली ही परंपरा खुप मोठ्या प्रमाणात मोठ्या धुमधडाक्यात साजरी केली जाते. पण वरचेवर त्यांचा मूळ उद्देश बाजूला जाऊन त्याला व्यापारी ,बाजारी आणि बिभीत्स स्वरूप येऊ लागले आहे यांची खंत वाटते.

वर्गणी जबरदस्तीने खंडणी वसुल केल्यासारखी

करून कित्येक गल्लीबोळात नावापुरते गणपती बसवून मोठ्याने गाणी लावून ठेवतात,आणि विसर्जन केल्यानंतर जमा झालेल्या वर्गणीच्या पैशातून चक्क पार्ट्या करतात बरेचदा. खरोखर लाज वाटते हे सांगतानासुद्धा पण ही वस्तुस्थिती आहे. यापेक्षा अशा गोळा झालेल्या वर्गणीतून एखाद्या गरजू संस्थेला मदत केली तर किती छान होईल? समाजसेवाही घडल्याचे पुण्य गणपतीबाप्पा नक्कीच देतील.

गणपती आणताना, विसर्जन करताना एकापेक्षा एक मोठ्ठ्या, फटाक्यांच्या माळा, प्रदूषण करणारे फटाके चढाओढीने लावतात. त्यामुळे आनंद होण्यापेक्षा त्रासच जास्त होतो.ध्वनी प्रदूषण,वायू प्रदूषण होऊन प्रसंगी कित्येकाना

अक्षरशः दुखणी येतात. हे योग्य नाही ना? खरेतर सर्वच सणाना, उत्सवांना फटाके फोडणे किंवा डीजे ठराविक आवाजापेक्षा मोठ्या आवाजात लावायला बंदी करायला हवी.

देवाची गाणी किंवा भजने, यासारखे कर्णमधुर संगीत ऐकण्या ऐवजी डीजे वर कर्णकर्कश्य आवाजात लावण्या किंवा सिनेमा मधील

फालतू गाणी लावून त्यावर अंगविक्षेप करत नाचतात, अगदी गल्लोगल्ली छोटे,मोठे मंडप घालून आरास करतात, स्पर्धेने देखावे साकारतात.त्यामुळे नागरिकांची ,वाहतुकीची खुप गैरसोय आणि कोंडी होते . लहान बाळे, आजारी माणसे, वयोवृद्ध माणसांची तर दखलच घेतली जात नाही, मुलांच्या परीक्षा, अभ्यास असतात ,त्यांना त्रास होईल याची आजिबात जाणीव नसते याची खरोखर लाज वाटते. आणि वाईट सुद्धा वाटते.हे सारे आपणच बदलायला पाहिजे.

**काही गावात अलीकडे ' एक गाव एकगणपती '** ही संकल्पना राबवली जात आहे. त्यांचे खरोखर कौतुक वाटते.आता मोठ्या शहरांमधून दूरच्या अंतरामुळे, गर्दी, वाहतुकी मुळे हे शक्य नाही पण किमान एका विभागात एक गणपती तरी बसवावा. त्यामुळे लोकांना, रहदारीला त्रास होणार नाही, उलट आनंद वाढेलच. त्या निमित्ताने समाज उपयोगी कामे करून, धार्मिक व सामाजिक कार्यात आपल्यामुळे आनंद निर्माण होईल असे करावे स्वतः पण आनंद मिळवावा व इतरांनाही वाटावा तरच या उत्सवांचा खरा उद्देश सफल होईल. गणेश जयंती,गणेशोत्सव आणि सारेच उत्सव जर सर्वांनी एकीने आणि इतरांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही अशी काळजी घेऊन साजरा केला तर यांचा आनंद नक्कीच द्विगुणीत होईल. आणि लोकमान्य टिळक यांचा उद्देश सफल होईल. प्रयत्न तरी करून पाहू या. मग उशीर कशाला? शुभस्य शीघ्रम! यंदाच्या गणेशोत्सवातच करूया ना सुरुवात..



**-सौ . स्नेहा मुसरीफ ,पुणे**

# अंबरनाथ-शिवमंदिर



मुंबईनगरीचे एक उपनगर अंबरनाथ. अंबरनाथ हे नाव बहुतेक अमरनाथ म्हणजेच शिवशंकर यावरुन पडले असावे. हळेबीड-बेलूरची आठवण व्हावी असे एक महादेवाचं मंदिर इथे आहे. मंदिराचे प्रवेशदाराजवळ एक शिलालेख आढळते. रॉयल एशियाटीक सोसायटीच्या एका खंडात हा इ. स. १०६० चा शिलालेख छापला आहे. मंदिराच्या प्रवेशदाराप-ाशी दोन नंदी आहेत. एका नंदीच्या गळयात शिवलिंग आहे. आत शिरल्यावर अठरा खांबांचा भव्य सभामंडप दिसतो त्यातले चारच खांब आता दिसतात ज्यावर सुरेख नक्षीकाम दिसते. बाकीचे खांब मात्र भिंतीत बुजले आहेत. मंडपाचे छत व कळस यामझे पोकळी आहे. कोनात जोडून असलेल्या गाभाऱ्यामुळे ऊनसावल्यांचा वेधक दृष्य पहायला मिळते. संपूर्ण मंदिर सव्वादोनशे कोरीव हत्तींच्या पाठीवर बांधलेले आहे. मंदिराच्या बाह्यांगाला चारी बाजूला विविध शिल्पे आहेत. त्यात त्रिशूल घेतलेली शिवमूर्ती, लक्ष्मीची मूर्ती, शिवलिंग, पार्वती, नरमुंडधारी महाकाली, शिवपार्वती विवाह, हंसारुढ ब्रम्हदेव, वराहरुढ विष्णू, ऊजव्या सोंडेचा गणपती, नृत्यांचे आविष्कार, शृगांरिक कामशिल्पे आढळतात. काळाच्या ओघात त्यात बरीच पडझड झालेली आहे.

-ललरीपरींह ढशाश्रिशसभामंडपातील कोरलेले खांब म्हणजे कोरीवकामाचा उत्कृष्ट नमुनाच होय. सभामंडपाच्या मध्यभागावरील झुंबर त्याच्या भोवतालची वर्तुळे, घुमट, त्यावरचे नक्षीकाम फारच सुरेख आहे. गाभारा दिवसाउजेडी पाहिला तर आतील भागात योगी शिव कोरलेला दिसतो. सभामंडपापासून दहाबारा पाय-या उतरल्यावर गाभारा दिसतो. त्यात एक स्वयंभू काळया पाष-ाणाचे शिवलिंग व दुसरे घडीव गारगोटीचे शिवलिंग आहे. आंबा, चिंच यांची दाट राई इथे एकेकाळी असावी असं वाटतं. वढवाण नदीच्या ऐन काठावर हे मंदिर सहज लक्षात येत नसलं तरी प्रेक्षणीय नक्कीच आहे.

कसे जाल?

अंबरनाथ हे सेंट्रल लाईनवर मुंबई दादर स्टेशन पासून ५२ किमी. वर आहे. रेल्वेने गेल्यास १ तासाचे अंतर आहे व हे मंदिर अंबरनाथ स्टेशपासून रिक्शाने काही मिनिटांच्या अंतरावर आहे.

**– कुंदा कुलकर्णी**

## आनंदाचा पारिजातक

छोटया छोटयाशा क्षणांतील
मजा चाखत जगता यावे
पार नसलेल्या आनंदाला मग
इवल्याशा मुठीत मावता यावे
थकून सायंकाळी घरी आल्यावर
प्रसन्न वदनी दीप उजळावे
दाराआड लपलेल्या गंमतीने
चिमुकल्या पावलांचे रुप घ्यावे
हेतूक - अहेतूक नाजूक कटाक्षांनी
मोहरत्या कळयांचे गंध व्हावे
जीवन डवरणा-या क्षणांना
धडकत्या स्पंदनांनी साक्ष रहावे
दाटून येणा-या स्निग्धतेतून
पोक्तशा मायेचे स्पर्श जाणवावे
जीवनाशी राखून जाळ अबाधित
विश्वासाने या मला वात्सल्य ल्यावे
चिमखडया गोड गोड बोलांना
भाबडे बोबडे प्रश्न पडावे
निरर्थक अशा हावभावांनीही
हसून हसून बेजार व्हावे
पक्ष्यांचा ऐकत मंजूळ किलबिलाट
हिरव्याकंच साजाने नाचनाचावे
क्षितीजावर करुन सोनेरी उधळण
निसर्गाच्या कुंचल्याने परीस व्हावे
महाल गाडया नि शेतीवाडया
कशास यांचे अप्रूप वाटावे
फुलवाया मळे आनंद अंगणी
वणवण फिरण्या ते का लागावे
आनंदाचा असा पारिजातक
सदैव दरवळतो मनामनात
शोधावा तेव्हा तो सापडतो
आपला आपल्याच आंगणात


# आदर्श




मग काय म्हणताय माझ्या बालमित्रांनो संपली का परिक्षा? सुट्टी लागली असेल आणि सुट्टीत काय काय करायचे कुठे कुठे जायचे याचे वेळापत्रकही तयार झाले असेल. कुणी सुट्टीला मामाकडे जाणार असेल तर कुणी आई बाबांबरोबर सहलीला, कुणी वेगवेगळया शिबीरात भाग घेणार असेल तर कुणी पोहण्याचा क्लास लावला असेल. दिवसभर नुसती धमाल करत असाल नाही? आणि खरं सांगू का अशी धमाल तर करायलाच हवी सुट्टी. कारण वर्षभर तुम्ही शाळा, शिकवणी, अभ्यास आणि परिक्षा या सर्वांमध्ये इतके गुंतलेले असता की धमाल करु म्हटले तरी वेळ नसतो.

बालमित्रांनो आजपर्यंत तुम्ही आजी आजोबांकडून किंवा पुस्तकांतून बर्याच गोष्टी ऐकल्या व वाचल्या असतील आणि त्यातून काही शिकलाही असाल. तुम्ही तुमच्या अवतीभवती किंवा बागेत अनेक प्राणी, पक्षी आणि अजूनही खुप काही गोष्टी पाहता, पण त्या गोष्टीमधील महत्वाची वैशिष्टे घेण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केलाय का? तुम्ही आता या सुट्टीत मागच्या सुट्टीपेक्षा एक वर्षाने मोठे झालात आणि हेच पुढच्या सुट्टीत पण होणार मग मोठे झालात तरीपण छोटेपणातले धडे विसरायचे नाही हं!


डीीूरआता हेच पहा तुम्ही सुर्य रोज पाहता पण याचा कधी विचार केला का की सुर्य ज्याप्रमाणे तेजस्वी राहून सर्वांना प्रकाश देतो तसेच मी पण तेजस्वी बनण्याचा प्रयत्न करील.



क्रीींळतुम्ही हत्तीदादाला पाहता. त्याचे ते भले मोठे शरीर, सुपाएवढे कान आणि लांब अशी सोंड हे सर्व पाहता पण कधी त्याच्या इवल्याश्या डोळयातील तीक्ष्ण नजरेचा विचार केलाय का? तेव्हा मित्रांनो आपल्याला ह्या छोटयाश्या पण तीक्ष्ण अशा हत्तीदादाच्या दृष्टीचा आदर्श घ्यायचाय.



डळपहरजंगलचा राजा सिंह. त्याचा तो रुबाब, एक डरकाळी फोडली तर जंगल हादरुन जाईन. त्याच्याकडून आपल्याला काय घेता येईल बरे? तर आपल्यामध्ये मोठी ताकद येण्यासाठी सिंहाच्या शरीरयष्टीचा आदर्श घ्यायचा.



त्र्ह्वेवरअतिशय चपळ असा प्राणी म्हणजे घोडा. तुम्हाला काय वाटते याच्याकडे पाह्यल्यावर? याच्याकडून आपल्याला शिकता येणारी गोष्ट म्हणजे मोठी धाव घेण्यासाठी लागणारी बळकट टाप. मग घेणार ना ह्या बळकट टापेचा आदर्श धावायला?

त्र्ह्रींवआकाराने मोठा असून सुध्दा आकाशात उंच उंच भरारी मारणारा पक्षी म्हणजे गरुड. आपल्याला यशस्वी व्हायचे असेल तर गरुडाचा आदर्श घेऊन त्याच्याकडून गगनभरारी घेण्यासाठी लागणारी झेप घ्यावी.



चींपसळमुंगी ही अतिशय छोटा प्राणी. साखरेचा एक दाणा मिळवण्यासाठी ती किती धडपड करते, किती अथक परिश्रम करते. मग साखर म्हणजे हवे ते मिळवायचे असेल तर मुंगीचा आदर्श घ्यायला काय बिघडते?

घहरीअसे म्हणतात राम रावण युध्दाच्यावेळी पुल बांधण्यासाठी खारुताईने छोटे छोटे खडे गोळा केले आणि तिच्या या कामाबद्दल रामाने तिच्या पाठीवरुन हात फिरवून शाबासकी दिली. त्याची खूण म्हणजे खारुताईच्या पाठीवर असलेल्या पाच रेषा ज्या रामाच्या बोटांनी उठल्या असे म्हणतात. मग चांगले काम करुन सर्वांना मदत करुन खारुताईच्या पाठीचा आदर्श घ्यायला काय हरकत आहे?

कोकिळेला पाह्यल्यावर रंगाने काळा असलेला हा पक्षी त्याच्या कंठातून किती मधूर स्वर येतात. तसेच मधूर स्वर जर आपल्या कंठातून बाहेर पडले तर किती छान होईल.

तेव्हा बालमित्रांनो ह्या सर्व गोष्टी पण तुम्ही ध्यानात घ्या आणि सुट्टीत जे जे काही पाहाल अनुभवाल त्यातून चांगल्या गोष्टी घेऊन पुढे चला आणि त्या नेहमी तुमच्या जवळ असू द्या. खुप खुप मजा करा आणि पुढच्या वर्षाचे हसत स्वागत करा.

**– मनिषा नवले, पुणे**

## गरोदर स्त्रियांनी मीठाचं सेवन जास्त करू नये, कारण... डॉक्टर टीप्स



आई-बाबा व्हायचं आहे? ङ्गसेफफएक पर्याय

आजही सामान्यतः गरोदर स्त्रियांना या काळात काय खावे आणि काय खाऊ नये या गोष्टी माहित नसतात. पण त्या माहित असायलाच हव्यात. जेणेकरून कोणताही धोका आई व बाळ दोघांना होणार नाही आणि ते या काळात सुरक्षित राहून अगदी योग्य पद्धतीने डिलिव्हरी होईल.

गरोदरपणात मीठ खाल्लं तर आरोग्यासाठी फायदेशीर असतच. परंतु मिठाचं अतिसेवन आरोग्यासाठी अपायकारक ठरू शकतं. जेवणात मिठाची चव नसेल, तर ते आपल्याला खूप निस्तेज वाटते. चवीसोबतच आरोग्यासाठी मीठ खूप महत्त्वाचे आहे. कारण त्यात सोडियम मुबलक प्रमाणात असते. सोडियम आपल्या शरीरातील पीएच आणि द्रव पातळी संतुलित करते.

## विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
– कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारव-ाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### हा कसा मोदींचा स्वार्थी हेतू...'; श्रीसंतला कानशिलात मारल्याचा व्हिडिओ लीक झाल्यानंतर हरभजनची पहिली संतप्त प्रतिक्रिया

दिल्ली-क्रिकेटमधल्या सर्वात वादग्रस्त क्षणांपैकी एक असलेला 'स्लॅप-गेट'चा व्हिडिओ अचानक समोर आल्यामुळे पुन्हा एकदा चर्चा रंगली आहे. या घटनेत २००८ च्या आयपीएलदरम्यान हरभजन सिंगने एस. श्रीसंतला कानाखाली मारली होती. त्या हंगामातला आणि एकूणच क्रिकेट इतिहासातला तो एक लक्षात राहणारा प्रसंग ठरला होता. पण यावेळी हा व्हिडिओ लीक करणारे माजी खझङ चेअरमन ललित मोदी होते आणि यावर हरभजन सिंगने अखेरची मौनव्रत सोडले आहे.भज्जीने एका पेजशी बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितलं, ''१८ वर्ष जुना व्हिडिओ बाहेर काढणं चुकीचं आहे. हे एखाद्या स्वार्थी हेतूनं केलं गेलंय. लोक ही गोष्ट विसरून गेले होते, पण आता पुन्हा त्यांच्या आठवणी जाग्या केल्या जात आहेत.'' त्यानं हेही सांगितलं की, तो प्रसंग मागे टाकून तो पुढं गेलेला आहे, आणि अशा प्रकारे वारंवार मुद्दा काढणं म्हणजे फक्त गैरसोयीचं कारण ठरणार आहे.हरभजन अनेकदा मान्य करत आला आहे की त्या घटनेबद्दल त्याला खूप लाज वाटते. श्रीसंतला कानाखाली मारल्याबद्दल त्याने अनेक वेळा माफीही मागितली आहे. आता दोघांमध्ये सगळं काही ठीक आहे. पण ललित मोदींनी १८ वर्ष जुना व्हिडिओ सोशल मीडियावर टाकल्यानंतर हा प्रकार पुन्हा एकदा क्रिकेट चाहत्यांच्या आठवणीत ताजा झाला. हरभजन म्हणाला की, ''जे घडलं त्याबद्दल मला वाईट वाटतं. आम्ही खेळत होतो आणि त्या वेळी डोक्यात खूप गोष्टी चालू होत्या. चूक झाली आणि त्याचं दु:ख आहे. हो, व्हिडिओ व्हायरल झाला आहे. ती एक दुर्दैवी घटना होती आणि मी अनेकदा सांगितलंय की माझ्याकडून चूक झाली.

***

### राजस्थान रॉयल्सच्या सर्वसाधारण कामगिरीचे खापर द्रविडवर- एबी डीव्हिलियर्स

दिल्ली-प्रीमियर लीग फुटबॉल स्पर्धेत ज्याप्रमाणे संघाच्या सर्वसाधारण कामगिरीचे खापर मॅनेजरवर फोडले जाते त्याचप्रमाणे राजस्थानच्या कामगिरीसाठी प्रशिक्षक राहुल द्रविड यांना जबाबदार ठरवून त्यांची उचलबांगडी करण्यात आल्याचा दावा एबी डी'व्हिलियर्सने केला आहे.२०२५ हंगामात राहुल द्रविड राजस्थान रॉयल्सचे प्रशिक्षक होते. राजस्थानचा संघ बादफेरीसाठी पात्र ठरू शकला नाही. त्यांना आठव्या स्थानावर समाधान मानावे लागले. द्रविड यांना संघटनात्मक रचनेत मोठ्या भूमिकेचा प्रस्ताव ठेवण्यात आला. मात्र त्यांनी तो स्वीकारला नाही असे राजस्थान रॉयल्सने त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

'हा राजस्थान रॉयल्सच्या मालकांचा निर्णय वाटतो. व्यवस्थापनाचा निर्णय वाटतो. त्यांनी द्रविडसमोर मोठ्या भूमिकेचा प्रस्ताव ठेवला, तो त्याने नाकारला. तो कदाचित नाराज असू शकतो. राहुल हा महान खेळाडू आहे. त्याच्या अनुभवाचा, मार्गदर्शनाचा फायदा अनेक युवा खेळाडूंना झाला आहे. त्याचे क्रिकेटचे ज्ञान अफाट आहे. आमच्या खेळावर, वागण्यावर द्रविड यांचा मोठा प्रभाव आहे असे अनेक युवा खेळाडूंनी मला सांगितले', असे एबीने सांगितले. द्रविडच्या मार्गदर्शनातच भारतीय संघाने गेल्या वर्षी टी२० वर्ल्डकपच्या जेतेपदावर नाव कोरले होते. असे असूनही द्रविड यांची उचलबांगडी झाली. 'प्रीमिअर लीग फुटबॉल स्पर्धेत असेच होते. संघाच्या सुमार कामगिरीसाठी प्रशिक्षकांना जबाबदार धरलं जातं. संघाचे प्रशिक्षक, व्यवस्थापक प्रचंड दडपणाखाली असतात.

### रोहितने दिली फिटनेस टेस्ट; पास की नापास, वन-डे खेळणार की नाही?

मुंबई,-टीम इंडियाचा वनडे कर्णधार रोहित शर्मा बराच काळ स्पर्धात्मक क्रिकेटपासून दूर आहे. हिटमॅनला पुन्हा मैदानात पाहण्यासाठी चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या वनडे मालिकेत अखेर रोहित शर्मा मैदानात उतरतानाचे चित्र स्पष्ट होते आहे. रोहितच्या फिटनेसवर कायम प्रश्नचिन्ह निर्माण केले जात असले तरी त्याला आपल्या खेळाने व जिद्दीने उत्तर द्यायची कला त्याला चांगल्या प्रकारे येते. अलीकडेच त्याने ते करूनही दाखवले.

फिटनेस टेस्टमध्ये हिटमॅनचा जलवा-ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका १९ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. त्याआधी टीम इंडियाच्या खेळाडूंची फिटनेस चाचणी घेण्यात आली. रोहितही या टेस्टमध्ये सहभागी झाला आणि उत्तम गुणांसह ती उत्तीर्ण केला. यामुळे त्याच्या फिटनेसवर संशय घेणाऱ्यांचे तोंड बंद झाले.

अवघ्या २० दिवसांत खेळ पलटला .फिटनेस टेस्ट पूर्ण करून मुंबईत परतल्यानंतर रोहितला पाहण्यासाठी विमानतळावर चाहत्यांची गर्दी उसळली होती. यावेळी तो पूर्णपणे तंदुरुस्त दिसत होता. काही आठवडे आधी जेव्हा तो कुटुंबासह सुट्टीवरून परतला होता, तेव्हा तो थोडासा जाड व पोट वाढलेला दिसत होता. पण अवघ्या २० दिवसांत रोहितने मेहनतीने वजन कमी केले.रोहित शर्मा झाला पासखरंतर, जर रोहित शर्माने ही चाचणी उत्तीर्ण केली नसती तर त्याला टीम इंडियाच्या संघात स्थान मिळाले नसते.

## भारताचा सलग दुसऱ्या विजयासह सुपर-४ मध्ये प्रवेश

पाटणा : भारतीय संघाने आशिया कप हॉकी स्पर्धेच्या सुपर-४ मध्ये दिमाखात प्रवेश केला आहे. रंगतदार लढतीत भारतीय संघाने जपानवर ३-२ असा विजय मिळवला. या विजयासह भारत पूल अ पॉइंट टेबलमध्ये नंबर-१ वर पोहोचली आहे.

राजगीर येथील बिहार स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी हॉकी स्टेडियमवर मनदीप सिंगच्या गोलने भारताने आघाडी घेतली. त्याने तिसऱ्या मिनिटाला फील्ड गोल केला. त्यानंतर ५ व्या मिनिटाला कर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरवर गोल करून भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. हाफ टाइमपर्यंत भारतीय हॉकी संघाने सामन्यावर आपली पकड मजबूत केली होती.

तिसऱ्या क्वार्टरमध्ये जपानने कवाबे कोसेईच्या गोलने सामन्यात पुनरागमन केले. कोसेईने बॅक हँड शॉट मारला आणि चेंडू गोलपोस्टच्या आत ढकलला. चौथ्या क्वार्टरच्या अगदी आधी भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने आणखी एका पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. हा हरमनप्रीतचा दुसरा आणि भारतीय संघाचा तिसरा गोल होता. शेवटच्या शिट्टीच्या अगदी आधी जपानच्या कावाबे कोसेईने आपला आणि संघाचा दुसरा गोल केला. पण तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.




## भारत-पाकिस्तान सामना आता कधी सुरू होणार?

नवी दिल्ली: आगामी आशिया कप २०२५ सुरू होण्याआधीच क्रिकेटप्रेमींसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. या स्पर्धेतील काही सामन्यांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. आता भारत आणि पाकिस्तानसह इतर संघांचे सामने नियोजित वेळेपेक्षा अर्धा तास उशिरा सुरू होणार आहेत.

हे आहे नवीन वेळापत्रक

आशिया कप २०२५ चे सर्व सामने भारतीय वेळेनुसार (खडढ) संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होणार होते. परंतु, आता स्पर्धेतील १९ पैकी १८ सामने स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी ६:३० वाजता सुरू होतील, ज्याचा अर्थ भारतीय वेळेनुसार रात्री ८:०० वाजता हे सामने सुरू होतील.भारत-पाकिस्तान महामुकाबला

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय-व्होल्टेज मुकाबला १४ सप्टेंबर रोजी दुबईमध्ये होणार आहे. नवीन नियमांनुसार, हा सामना आता रात्री ७:३० ऐवजी रात्री ८:०० वाजता सुरू होईल. याशिवाय, टीम इंडिया आपला पहिला सामना १० सप्टेंबर रोजी यूएईविरुद्ध खेळेल आणि तो देखील रात्री ८:०० वाजता सुरू होईल.बदलाचे कारण-स्थानिक वेळेनुसार उन्हाळ्यातील वातावरण आणि खेळाडूंच्या सोयीसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते.आशिया कप २०२५:स्पर्धेचा कालावधी: ९ ते २८ सप्टेंबर २०२५

स्थळ: दुबई आणि अबू धाबी, यूएईफॉरमॅट: टी-२०

एकूण संघ: ८ (भारत, कस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान, यूएई, ओमान, हाँगकाँग)भारताचे सामने (ग्रुप स्टेज):१० सप्टेंबर: भारत विरुद्ध यूएई (दुबई)१४ सप्टेंबर: भारत विरुद्ध पाकिस्तान (दुबई)


१९ सप्टेंबर: भारत विरुद्ध ओमान (अबू धाबी)

## आशिया कप २०२५ पूर्वी बीसीसीआयमध्ये मोठे बदल, राजीव शुक्ला बनले हंगामी अध्यक्ष

मुंबई : एशिया कप २०२५ मध्ये भारताचा पहिला सामना १० सप्टेंबर रोजी यूएई विरुद्ध होणार आहे,त्याला सुरू होण्यास आता दोन आठवड्यांपेक्षा कमी वेळ उरला आहे. याच दरम्यान एक मोठी बातमी समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजीव शुक्ला यांना बीसीसीआयचा कार्यवाहक अध्यक्ष नेमण्यात आलं आहे. रॉजर बिन्नी लवकरच अधिकृतपणे आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

२७ ऑगस्ट रोजी राजीव शुक्ला यांच्या नेतृत्वाखाली बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांची एक बैठक झाली होती. या बैठकीत भारतीय संघाच्या टायटल स्पॉन्सरशी असलेल्या ड्रीम११ च्या कराराच्या समाप्तीवर आणि नवीन करार शोधण्यावर चर्चा झाली. सांगायचं झालं तर, २०२२ मध्ये सौरव गांगुली अध्यक्ष पदावरून हटल्यानंतर रॉजर बिन्नी यांनी अध्यक्षपद स्वीकारले होते. आता ते ७० वर्षांहून अधिक वयाचे झाले असल्याने ते लवकरच आपला राजीनामा जाहीर करू शकतात.

राजीव शुक्ला यांचा जन्म १३ सप्टेंबर १९५९ रोजी झाला होता. सध्या त्यांचे वय ६६ वर्षे आहे. ते आधी पत्रकार होते, त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला आणि नंतर भारतीय क्रिकेटमध्ये एक खास स्थान निर्माण केलं. २०१५ मध्ये त्यांची आयपीएलचे चेअरमन म्हणून नियुक्ती झाली. १८ डिसेंबर २०२० रोजी त्यांना बीसीसीआयचे उपाध्यक्ष बनवण्यात आलं. सध्या ते छत्तीसगडमधील राज्यसभा खासदारांपैकी एक आहेत.



नियमांनुसार, कोणत्याही बीसीसीआय पदाधिकाऱ्याचे कमाल वय ७० वर्षे आहे. रॉजर बिन्नी यांचा जन्म १९ जुलै १९५५ रोजी झाला असून, ते आता ७० वर्षांचे झाले आहेत. त्यामुळे ते अध्यक्षपदावर राहण्यास अयोग्य ठरतात. नवीन अध्यक्ष निवड होईपर्यंत राजीव शुक्ला हे कार्यवाहक अध्यक्ष म्हणून काम पाहतील. बीसीसीआय सध्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर लोढा समितीच्या शिफारसींवर आधारित संविधानानुसार चालते.

रॉजर बिन्नी हे १९८३ च्या वर्ल्ड कप विजेता संघाचे सदस्य होते. त्यांनी भारतासाठी २७ कसोटी आणि ७२ एकदिवसीय सामने खेळले असून, अनुक्रमे ४७ आणि ७७ विकेट्स घेतल्या आहेत.बीसीसीआय सध्या भारतीय क्रिकेट संघासाठी नवीन टायटल स्पॉन्सर शोधत आहे. कारण ऑनलाइन गेमिंगसंबंधी नवीन कायदा आल्यामुळे ड्रीम११ सोबतचा करार नियोजित कालावधीपूर्वीच संपुष्टात आला आहे. एशिया कप ९ सप्टेंबरपासून सुरू होत आहे, आणि त्याआधी नवीन टायटल स्पॉन्सर मिळवणं आव्हानात्मक वाटतंय. बीसीसीआय काही दिवसांत नवीन प्रायोजकासाठी जाहिरात जारी करू शकतो.

## टी-२० वर्ल्डकपआधी ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कने अचानक केली निवृत्तीची घोषणा



मुंबई: ऑस्ट्रेलियाचा डावखुरा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटला रामराम ठोकला आहे. कसोटी क्रिकेटमधील आपल्या कामगिरीवर आणि पुढील काही वर्षांत होणाऱ्या महत्त्वपूर्ण मालिकांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्टार्कने हा निर्णय घेतला आहे. ३५ वर्षीय स्टार्कला वाटते की, या निवृत्तीमुळे त्याला कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये आपली फिटनेस आणि फॉर्म सर्वोत्तम ठेवण्यास मदत होईल, ज्यामुळे तो २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात ऑस्ट्रेलियासाठी खेळू शकेल. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये स्टार्कने २०१२ मध्ये पदार्पण केले होते आणि १३ वर्षांच्या कारकिर्दीत त्याने ६५ सामने खेळले. या सामन्यांमध्ये त्याने २३.८१ च्या सरासरीने ७९ बळी घेतले आहेत.

ऑस्ट्रेलियासाठी टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत तो डम झाम्पानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियाने टी-२० विश्वचषक जिंकला, त्यात त्याने मोलाची कामगिरी बजावली होती.

स्टार्कने आपल्या निवृत्तीच्या घोषणेवेळी सांगितले की, कसोटी क्रिकेट नेहमीच माझी सर्वोच्च प्राथमिकता राहिली आहे. ऑस्ट्रेलियासाठी टी-२० क्रिकेट खेळताना मी खूप आनंद घेतला. विशेषतः २०२१ चा विश्वचषक जिंकण्याचा अनुभव अविस्मरणीय होता. पण आता मला कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटवर पूर्ण लक्ष केंद्रित करायचे आहे.

मिचेल स्टार्क हा कसोटी क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियासाठी चौथा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे आणि कसोटीमध्ये ४०० हून अधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत त्याचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही तो कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेट खेळत राहणार आहे.

## सात्त्विक-चिरागची अभिमानास्पद कामगिरी

नवी दिल्ली : बॅडमिंटनमधील भारताची आघाडीची जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने जागतिक स्पर्धेची उपांत्य फेरी गाठताना आपले पदक निश्चित केले. या जोडीचे हे दुसरे जागतिक पदक असेल. पॅरिस ऑलिम्पिकमधील पराभवाची परतफेड करत सात्त्विक-चिराग जोडीने उपांत्यपूर्व फेरीत मलेशियाच्या दोन वेळच्या ऑलिम्पिक विजेत्या आरोन चिया-सोह वुई यिक जोडीचा ४३ मिनिटांत २१-१२, २१-१९ असा पराभव केला.

तेच शहर, तेच केंद्र आणि तेच कोर्ट आणि त्याच प्रतिस्पर्ध्यांकडून आम्ही एक वर्षापूर्वी पराभव पत्करला होता. ऑलिम्पिक स्पर्धेतील ते अपयश आज जागतिक स्पर्धेतील विजयाने धुऊन टाकले. आम्ही खूप आनंदी आहोत असे चिरागने सांगितले. सात्त्विक-चिराग जोडीने यापूर्वी २०२२ मध्ये या स्पर्धेत कांस्यपदक मिळविले होते. त्यानंतर पुन्हा एकदा ही जोडी जागतिक पदकापर्यंत पोहोचली



आहे. आता या पदकाचा रंग तोच राहणार की बदलणार यासाठी भारतीय चाहत्यांना प्रतीक्षा करावी लागेल. भारतीय जोडीची गाठ आता चीनच्या ११व्या मानांकित चेन बो यांग आणि लियु यी जोडीशी पडणार आहे. आम्ही कुठल्याही प्रतिस्पर्ध्यास कमी लेखत नाही. क्षमता आणि कौशल्य असल्यामुळे प्रत्येक जण या क्षणापर्यंत पोहोचत असतो. आम्ही यापूर्वी त्यांच्याशी खेळलो आहोत. आम्हाला या लढतीची प्रतीक्षा असेल,'' असेही चिराग म्हणाला.उपांत्यपूर्व फेरीत सुरुवातीपासूनच अचूक फटक्यांवर नियंत्रण ठेवणार्या भारतीय जोडीने 'सर्व्हिस'वरदेखील चांगले गुण मिळविले. सर्वात विशेष बाब म्हणजे प्रदीर्घ रॅलीतदेखील त्यांनी प्रतिस्पर्धी जोडीवर वर्चस्व राखले. या सामन्यातील एक रॅली तर सर्वाधिक ५९ फटक्यांची झाली. भारतीय खेळाडूंनी लय कायम राखण्यासाठी खेळातील आक्रमक धोरण चांगले राबवले आणि याचाच फायदा त्यांना झाला.

'दुसर्या गेममध्ये आघाडीवर असतानाही आम्हाला लढत सोपी नसणार असेच वाटत होते. त्यामुळे आम्ही प्रतिस्पर्धी जोडीस छोटीशीदेखील संधी मिळू दिली नाही. लढतीवर नियंत्रण असल्यामुळे गुणांसाठी घाई करणे टाळले. आम्हाला सर्वोत्तम खेळ करायचा होता आणि तो आम्ही केला. या वेळी स्पर्धेत खेळताना आमचे नियोजन वेगळे राहिले. प्रतिस्पर्ध्यापेक्षा आम्ही स्वतःवर लक्ष केंद्रित करणे. उद्दिष्टापासून ढळणार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत,'' असे सात्त्विकने सांगितले.



## भारतात महिला वर्ल्ड कप खेळणारे संघ होणार करोडपती

दुबई : भारतात ३० सप्टेंबरपासून महिला वनडे विश्वचषक सुरु होत आहे. आयसीसीने या स्पर्धेसाठी बक्षीस रकमेची घोषणा केली आहे. यावेळी विश्वचषक जिंकणाऱ्या संघावर भरपूर पैशांचा पाऊस पडणार आहे. महिला विश्वचषक जिंकणाऱ्या संघासाठी आयसीसीने ४.४८ दशलक्ष डॉलर्स (३९.४ कोटी) बक्षीस रक्कम जाहीर केली आहे. जी २०२२ मध्ये खेळल्या गेलेल्या वनडे विश्वचषकापेक्षा ४ पट जास्त आहे. २०२२ चा महिला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने जिंकले होते. २०२३ च्या पुरुष वनडे विश्वचषकापेक्षा बक्षीस रक्कम खूपच जास्त आहे. आठ संघांच्या या स्पर्धेची एकूण बक्षीस रक्कम १३.८८ दशलक्ष डॉलर्स आहे. जी २०२२ मध्ये न्यूझीलंडमध्ये झालेल्या गेल्या महिला विश्वचषकाच्या ३.५ दशलक्ष डॉलर्सच्या रकमेपेक्षा २९७ टक्के जास्त आहे. या महिला विश्वचषकाची एकूण बक्षीस रक्कम २०२३ च्या आयसीसी पुरुष विश्वचषकाच्या बक्षीस रकमेपेक्षाही जास्त आहे. २०२३ च्या वनडे विश्वचषकासाठी एकूण बक्षीस रक्कम १० दशलक्ष डॉलर्स होती.

सर्वच संघांना मिळणार बक्षीस

यावेळी उपविजेत्या संघाला २.२४ दशलक्ष डॉलर्स मिळतील. तर उपांत्य फेरीत पराभूत झालेल्या दोन्ही संघांना १.१२ दशलक्ष डॉलर्स मिळतील. तर गट-टप्प्यात प्रत्येक सामना जिंकणाऱ्या संघांना ३४,३१४ डॉलर्स मिळतील. तर पाचव्या आणि सहाव्या स्थानावर असलेल्या संघांना ७,००,००० डॉलर मिळतील, तसेच सातव्या आणि आठव्या स्थानावर असलेल्या संघांना २,८०,००० डॉलर्स मिळतील. त्याच वेळी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक संघाला २,५०,००० डॉलर्स मिळतील.

बक्षीसाच्या रकमेत चार पट होणार वाढ

बक्षीस रकमेची घोषणा करताना आयसीसीचे अध्यक्ष जय शहा म्हणाले की, ही घोषणा महिला क्रिकेटच्या प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आहे. बक्षीस रकमेत ही चार पट वाढ महिला क्रिकेटसाठी एक ऐतिहासिक क्षण आहे आणि त्यांच्या दीर्घकालीन विकासासाठी आमची स्पष्ट वचनबद्धता दर्शवते. आमचा संदेश सोपा आहे, महिला क्रिकेटपटूंना हे माहित असले पाहिजे की जर त्यांनी हा खेळ व्यावसायिकपणे खेळण्याचा निर्णय घेतला तर त्यांना पुरुषांइतकेच वागणूक दिली जाईल.

आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ चे वेळापत्रक

मंगळवार, ३० सप्टेंबर : भारत विरुद्ध श्रीलंका - बंगळुरू बुधवार, १ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध न्यूझीलंड - इंदूर गुरुवार, २ ऑक्टोबर : बांगलादेश विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो शुक्रवार, ३ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका - बंगळुरू शनिवार, ४ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध श्रीलंका - कोलंबो रविवार, ५ ऑक्टोबर : भारत विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो सोमवार, ६ ऑक्टोबर : न्यूझीलंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका - इंदूर मंगळवार, ७ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध बांगलादेश - गुवाहाटी बुधवार, ८ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो गुरुवार, ९ ऑक्टोबर : भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका - विशाखापट्टणम शुक्रवार, १० ऑक्टोबर : न्यूझीलंड विरुद्ध बांगलादेश - विशाखापट्टणम शनिवार, ११ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध श्रीलंका - गुवाहाटी रविवार, १२ ऑक्टोबर : भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया - विशाखापट्टणम सोमवार, १३ ऑक्टोबर : दक्षिण आफ्रिका विरुद्ध बांगलादेश - विशाखापट्टणम मंगळवार, १४ ऑक्टोबर : नवीन झीलंड विरुद्ध श्रीलंका - कोलंबो बुधवार, १५ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो गुरुवार, १६ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध बांगलादेश - विशाखापट्टणम शुक्रवार, १७ ऑक्टोबर : दक्षिण आफ्रिका विरुद्ध श्रीलंका - कोलंबो शनिवार, १८ ऑक्टोबर : न्यूझीलंड विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो रविवार, १९ ऑक्टोबर : भारत विरुद्ध इंग्लंड - इंदूर सोमवार, २० ऑक्टोबर : श्रीलंका विरुद्ध बांगलादेश - कोलंबो मंगळवार, २१ ऑक्टोबर : दक्षिण आफ्रिका विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो बुधवार, २२ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध इंग्लंड - इंदूर गुरुवार, २३ ऑक्टोबर : भारत विरुद्ध न्यूझीलंड - गुवाहाटी शुक्रवार, २४ ऑक्टोबर : पाकिस्तान विरुद्ध श्रीलंका - कोलंबो शनिवार, २५ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध श्रीलंका - इंदूर रविवार, २६ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड - गुवाहाटी रविवार, २६ ऑक्टोबर : भारत विरुद्ध बांगलादेश - बंगळुरू

बुधवार, २९ ऑक्टोबर : उपांत्य सामना १ - गुवाहाटी/कोलंबो गुरुवार, ३० ऑक्टोबर : उपांत्य सामना २ - बंगळुरू रविवार, २ नोव्हेंबर : अंतिम सामना - कोलंबो/बंगळुरू

## शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक स्वास्थ्य सांभाळा-अधिष्ठाता डॉ. आनंद पवार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शिव छत्रपती शिक्षण संस्था संचालित राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर (स्वायत्त) येथील वनस्पतीशास्त्र विभागाच्या सिंबायोसिस स्टुडंट्स असोसिएशनच्या उद्घाटन प्रसंगी बब्रुवान विठ्ठलराव काळे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लातूर येथील अधिष्ठाता डॉ. आनंद पवार यांनी उदघाटक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. आनंद पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, यशस्वी होण्यासाठी तत्पर प्रत्येकाच्या जीवनात आरोग्य ही सर्वात महत्त्वाची गोष्ट असली पाहिजे. याबरोबरच त्यांनी आयुर्वेदातील 'हिताहार मिताहार' ही संकल्पना विद्यार्थ्यांना पटवून दिली. विद्यार्थ्यांना शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक स्वास्थ्य सांभाळा असा सल्ला अधिष्ठाता डॉ. आनंद पवार यांनी दिला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सदाशिव शिंदे हे होते. तसेच सिंबायोसिस असोसिएशनचे प्रभारी प्राध्यापक डॉ. कल्याण सावंत व प्रा. ज्ञानोबा आव्हाड उपस्थित होते. तसेच उपप्राचार्य तथा वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सदाशिव शिंदे यांनी त्यांच्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कोणताही पदार्थ कमी प्रमाणात खाल्ल्यानंतर तो औषध म्हणून काम करतो आणि गरजेपेक्षा जास्त खाल्ल्यानंतर तो विष ठरतो. सिंबायोसिस असोसिएशनची अध्यक्षा हर्षिका परदेशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर सचिव आरती हिने प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. मायावती बिराजदार हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर पृथ्वीराज चव्हाण याने आभार मानले. विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व असोसिएशनच्या सर्व विद्यार्थी सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## चक्री भजनानंतर दहीहंडी फोडून श्रावणानुष्ठानाची सांगता

**औसा/प्रतिनिधी :**अभिर गुलाल उधळीत रंग नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग.. सद्गुरु वीरनाथ मल्लिनाथ दासवीनाथ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पावन परंपरेतील वार्षिक श्रावण तपो अनुष्ठानाची सांगता पीठाधिपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात व सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनात भक्ति उत्साहात विठ्ठल नामाच्या गजरात अभीर गुलाल बुक्का आणि पुष्प पाकळ्यांच्या वर्षावात उधळण करीत चक्रीभजन सेवा व ज्ञानेश्वरी प्रवचनानंतर दहीहंडी फोडून गोपाळ कल्याणी संपन्न झाली. चक्रीभजन ही या गुरु गादीची मुख्य उपासना असून मायामोह जंजाळातून मुक्त करणारी ही दिव्य साधना होय असे विचार सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगता दिनी आपल्या प्रवचनात मांडले. किंबहुना तुमचे केले धर्मकीर्तन ही सिद्धी नेले तेच माझे जे उरले पाईक पण या ज्ञानेश्वरीतील ओवीने आरंभ करून उपस्थित हजारो नाथभक्तांशी हितगुज करताना अनुष्ठानाचे महत्त्व मोठे आहे. यात तन मन धनाने सेवा नामस्मरण करणारे नित्यनेमाचे सेवेकरी आहेत. शरीरात असलेला नकारात्मक विचार नष्ट होऊन सकारात्मकता निर्माण होणे व भक्तीची ज्योत प्रज्वलित होऊन गुरू गादींची सद्गुरु समवेत सेवा घडणे हे भाग्याचे आहे. भजनात कळणारा न कळणारा ज्ञानी अज्ञानी लहानथोर प्रत्येक जीव चक्रीभजन सुरू झाल्यानंतर हाताने टाळी आणि मुखाने नाम घ्यायला लागतो. अवघ्या काही क्षणात तो त्या भजनाशी एकरूप होतो ही अनुभवास येणारी गोष्ट आहे. २८ नोव्हेंबर ते पाच डिसेंबर दरम्यान कार्यक्रम ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांना समाधी घेऊन पंचवीस वर्ष पूर्ण होतात. हा २५ वा पुण्यत्सव रौप्य महोत्सवी वर्ष आपण त्यांचे समाधिस्थळी श्री क्षेत्र गोपाळपूर मध्ये २८ नोव्हेंबर ते पाच डिसेंबर या दरम्यान साजरा करणार आहोत. यात गुरुवर्य श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांची सात दिवस भागवत कथा ज्ञान यज्ञ, श्री चैतन्य महाराज श्री एकनाथ महाराज हांडे श्री गोसावी महाराज पैठण श्री माधवदास नामदास महाराज यांचे कीर्तन सेवा होणार आहे.

## घराघरात सोनपावलांनी ज्येष्ठा गौरींचे आगमन: ज्येष्ठा गौरींचे गृहलक्ष्मींकडून उत्साहात स्वागत

**उजनी/प्रतिनिधी** :विघ्नहर्ता गणेशाच्या बहिणी ज्येष्ठा गौरी व कनिष्ठ गौरींचे रविवारी सायंकाळी धन-धान्याच्या सोनपावलांनी मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात घरोघरी आगमन झाले.रविवारी सायंकाळी दिवा लावणीच्या वेळी घरोघरी फुले उधळण करून गौरींचे महिलांनी उत्साहात स्वागत केले.आगमनाचा मुहूर्त सायंकाळी ५:२५ असल्यामुळे घरा घरांमध्ये महिलांची गौरी आगमनासह पूजेला लागणाऱ्या साहित्य खरेदीसाठी बाजारपेठेत महिलांची दिवसभर गर्दी झाली होती.आल्या आल्या गौरी गौरी, कशाच्या पावलांनी, गौरी आल्या लक्ष्मीच्या पावलांनी, सोन्या रुप्याच्या, मोत्याच्या पावलांनी असे म्हणत गौरींचे आगमन झाले.

ग्रामीण भागात महिलांनी घरातील तुळशी वृंदावनापासून तसेच काहींनी अंगणातून मोठ्या ताटात धान्यात लक्ष्मींना ठेवून पूजा करून आगमन झाले. गौरींचे औक्षण करून उंबरठ्यावर ठेवलेले धान्याचे माप ओलांडून,हळदी-कुंकवाच ्या पावलांचे ठसे उमटवत,ताट वाजवत तर काही ठिकाणी सनईच्या मंगल सुरासह, मोबाइलवरील ध्वनीच्या सुरात औक्षण केले. अनेक घरांमध्ये ज्येष्ठा गौरी व कनिष्ठ गौरींचे आगमन झाल्यावर गौरींना पाटावर मांडून फुलांच्या सजावटीत तसेच रांगोळी काढून पूजा केली.त्यानंतर रात्री उशिरा मखर सजावट,आकर्षक दिव्यांच्या सजावटीत गौरी बसवण्यात आल्या. सायंकाळी गौरीची विशेष पूजा करून दूध साखरेचा नैवेद्य दाखवून आरती करण्यात आली. सायंकाळी घरोघरी शेपूच्या, अंबाडीच्या भाजी, भाकरीचा नैवेद्य दाखवण्यात आला.मंडप, गौरी मुखवट्यासह पूजा साहित्य खरेदीला गर्दी उजनी बाजारपेठेत रविवारी सकाळपासूनच तयारी सुरू होती.



ज्येष्ठा नक्षत्रावर गौरींचे आगमन गौरींचे आगमन ज्येष्ठा नक्षत्रावर होते म्हणून तिला ज्येष्ठा गौरी म्हणतात असे सांगितले जाते. तसेच गौरीने असुरांचा संहार केला व शरण आलेल्या स्त्रियांना आणि त्यांच्या कुटुंबाला तसेच पृथ्वीवरील प्रत्येकाला सुखी केले. महालक्ष्मीच्या कृपाप्रसादाने आपल्याला सौभाग्य प्राप्त झाले, म्हणून तेव्हापासून सर्व स्त्रिया महालक्ष्मी गौरीची पूजा करू लागल्या अशी कथा पुराणात आहे.

## भटक्या विमुक्त समाजला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध - आमदार अभिमन्यू पवार



**औसा/प्रतिनिधी :** स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीनंतरही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या भटक्या विमुक्त समाजाला न्याय देण्यासाठी महायुती सरकारने तर अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत पण यासोबतच औसा मतदारसंघात भटक्या विमुक्तांचे एक सर्वेक्षण केले जाणार असून या सर्वेक्षणानुसार त्या कुटुंबाना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून दिले जाणार आहेत. या समाजाच्या वस्तीमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एक आराखडा तयार करून येणाऱ्या काळात त्यावर काम केले जाईल एकंदरीत भटक्या विमुक्तांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही आमदार अभिमन्यू पवार यांनी दिली आहे.

यावेळी कार्यक्रम आयोजन समिती अध्यक्ष लिंबराज जाधव, अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, पोलिस प्राधिकरण चे न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर, भटक्या विमुक्त चळवळीचे अभ्यासक अशोक तांबे, सहआयुक्त अभय अटकल, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, तहसीलदार शिवाजी कदम, सभापती चंद्रशेखर सोनवणे, साहित्यिक टि एस चव्हाण, शंकर साबरे, संतोषअप्पा मुक्ता, सुभाष जाधव, प्रवीण कोपरकर, प्रा सुधीर पोतदार, डॉ रेवणसिध्द देवणीकर आदीसह विविध भटक्या विमुक्त समाजाचे अध्यक्ष उपस्थित होते. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भटक्या विमुक्तांच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मासिक अर्थसहाय्यात २ वेळा वाढ केली, आता विद्यार्थ्यांचे अर्थसहाय्य थेट बँक खात्यावर जमा होते अशी माहिती देऊन आमदार म्हणून औसा मतदारसंघातील भटक्या विमुक्तांच्या उत्थानासाठी एक विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणाही आ पवार यांनी केली. विशेष अभियानाबाबत बोलताना सर्वप्रथम भटक्या विमुक्त समाजाचे सर्वेक्षण केले जाईल, त्यांच्याकडे उपलब्ध नसलेली कागदपत्रे त्यांना उपलब्ध करून देण्यात येतील आणि त्यानंतर त्यांना घरकुलसह विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यात येतील असं त्यांनी सांगितलं. भटक्या विमुक्तांच्या वस्त्यांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एक विशेष आराखडा तयार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाने जुलै महिन्यात शासन निर्णय काढून यापुढे ३१ ऑगस्ट हा दिवस भटके विमुक्त दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. अनेक वर्षांपासून भटके विमुक्त समाज व संस्थांची ही मागणी होती. मागील ७२ वर्षांपासून वंचित व उपेक्षित समाजाच्या या मागणची दखल घेतली गेली नाही पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संवेदनशीलतेचा परिचय देत ही मागणी मान्य केली व संपूर्ण भटक्या विमुक्त समाजात उत्साह निर्माण झाला. या उत्साहामागे कारणे सुद्धा होती. प्रथमच कुणीतरी आमचा आवाज ऐकतो आहे ही भावना निर्माण झाली होती, आमच्या प्रती सरकार संवेदनशील आहे, आता आमच्या विकासाचा मार्ग मोकळा होईल हा विश्वास निर्माण झाला. यावर्षी प्रथमच हा दिवस आपण सर्व मिळून उत्साहात साजरा केला जात आहे.ब्रिटिशांचे जुलमी राज्य उलथून टाकण्यासाठी अन्य समाजाप्रमाणे भटके विमुक्त समाजसुद्धा यात अग्रणी होता.१८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात या समाजाने सक्रिय सहभाग दिला होता. परंतु, हा संग्राम असफल झाला. ब्रिटिशांनी पुन्हा या प्रकारचे बंड होऊ नये म्हणून या जाती-जमातींना धडा शिकवण्यासाठी १८७१ चा 'गुन्हेगार जमाती कायदा' निर्माण केला. या कायद्यामुळे अनेक जातींना जन्मजात गुन्हेगार ठरवून विकासाच्या नावाखाली त्यांना डांबण्यात आले असेही प्रतिपादन यावेळी आ पवार यांनी केले.पोलीस प्राधिकरण चे उमाकांत मिटकर यांनी यावेळी भटक्या विमुक्त समाजाबद्दल ची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन अशोक तांबे व धनराज परसने यांनी केले.

### भटक्या विमुक्त च्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन तत्पर - अप्पर जिल्हाधिकारी - शिल्पा करमरकर

भटक्या विमुक्त समाजाला शासकीय योजने'ची माहिती मिळावी समाजामध्ये जागृती व्हावी यासाठी आशा संवाद मेळाव्याची गरज आहे. आपल्या अडचणी सोडविण्यासाठी शासन स्तरावर तत्पर असून शासनाच्या विविध योजनेचा लाभ घ्यावा.विशेषता आपल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत प्रशासन आपल्यासाठी काम करीत आहे. असे यावेळी लातूर चे अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी सांगितले.

## एका संदेशावर एक टेम्पो अन्नधान्य: देवणी गावातून मुंबईला केले रवाना

**देवणी/प्रतिनिधी** :देवणी मराठा आरक्षणाचे योध्दे मनोज जरांगे पाटील हे मुंबई येथील आझाद मैदानावर गरजवंत मराठ्यांच्या आरक्षणासाठी आंदोलन करत आहेत.त्यांना पाठिंबा देण्यासाठी गेलेल्या मावळ्यांना अन्नधान्य वितरण करण्यासाठी हेळंब धनेगाव तरुणांनी पुढाकार घेत आज एक टेम्पो अन्नधान्य रविवारी मुंबईकडे रवाना झाले आहे. मराठा आरक्षणासाठी मुंबईत दाखल झालेल्या मराठा बांधवांची सरकारकडून गोची केली जात आहे. रहाणे व खाण्या पाण्याची सोय नाही झाल्यास आंदोलन मोडीत निघेल या हेतुने मुंबईत हॉटेल , टपरी यावर निर्बंध घालण्यात आले.ही बाब मराठा बांधवांच्या लक्षात येताच तसा संदेश सोशल मीडियावर व्हायरल होताच मदतीचा ओघ मुंबईकडे वाढला आहे. देवणी तालुक्यातील हेळंब धनेगाव येथील तरुणांनी पुढाकार घेवुन भाकरी ,बेसण चे साहित्य,फरसाण ,पाणी बाटल,चटणी , चिवडा आदी एक टेम्पो अन्नधान्य वितरण करण्यासाठी तरुण मुंबईकडे रवाना झाले आहेत. दयानंद बिरादार,जयंत पाटील , बालाजी सोपान,दयानंद खारे , ज्ञानेश्वर व्यंकट , किशोर बिरादार,नरसिंग पुंडलिक, संदीप कमलाकर ,प्रणव बिरादार सह उपसरपंच रामलिंग शेरे आदी तरुण मुंबईकडे रवाना झाले आहेत.

## ग्रामीण विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकतेकडे वळावे

**लातूर/प्रतिनिधी** :लातूर ग्रामीण भागातील विद्यार्थी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याकडे वळावे या उद्देशाने चाकूर तालुक्यातील वडवळ येथे कलापंढरी संस्थेच्या पुढाकारातून क्राय संस्थेच्या मदतीने वडवळ (नागनाथ)येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत मिनी स्टेम यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान अभियंता आणि गणित विषयाचे प्रयोग करण्यासाठी अद्यावत लॅबचे उद्घाटन दि. २६ ऑगस्ट रोजी माजी प्राचार्य माधव गादेकर यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले आहे.

यावेळी कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सुर्यवंशी, मुख्याध्यापक गोपाळ एनकफळे, प्रा. रामकृष्ण सम्मुखराव, शालेय समिती अध्यक्ष संगमेश्वर कसबे, उपाध्यक्ष सरफराज कुरेशी, मुख्याध्यापिका धनश्री शर्मिला आदींची प्रमुख उपस्थितीत होती. यावेळी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विशाखा चव्हाण यांनी शाळेमध्ये स्टेमची कशी उभारणी झाली. तसेच या शाळेतून अनेक विद्यार्थी उत्कृष्ट खेळाडू या विद्यालयाने घडवले असून या विद्यालयातून अनेकवेळी केंद्र व तालुक्यात अनेक विद्यार्थी दहावीत प्रथम आल्याचे सांगितले. सर्व मान्यवर शाळेच्या प्रगती अहवाला मुळे समाधानी झाले. प्रा. रामकृष्ण संमुखराव यांनी विद्यार्थ्यांना विविध शोध आणि वैज्ञानिकांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी या मिळालेल्या संधीबद्दल आनंद व्यक्त केला. .

## शहीद विजय घोगरे यांना छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये श्रद्धांजली

**अहमदपूर/प्रतिनिधीः** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबई येथे सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी झालेले मराठा सेवक कै. विजय चंद्रकांत घोगरे यांचे शनिवारी ( दि. ३० ) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. या दुःखद घटनेनंतर आज ( ता ३१) रोजी अहमदपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोक सभा घेण्यात आली.

या सभेत, मराठा समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी शासनाच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त करत घोगरे यांच्या मृत्यूला सरकारची निष्क्रियता कारणीभूत असल्याचा आरोप केला.

या शोक सभेत बोलताना, सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलकांना शासनाकडून कशाप्रकारे हालअपेष्टांना सामोरे जावे लागले. याची सविस्तर माहिती दिली. सुमारे दोन तास चाललेल्या या कार्यक्रमात एक मराठा लाख मराठा, अमर रहे अमर रहे विजय भाऊ अमर रहे आणि जय भवानी, जय शिवाजी, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी, शहीद विजय घोगरे यांना न्याय मिळवून देण्यासाठी तहसीलदार यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात कै. विजय चंद्रकांत घोगरे यांना शहीद घोषित करून त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्याची आणि त्यांना आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वाढदिवसानिमित्त लातुर मध्ये सामाजिक कार्यक्रम संपन्न; काँग्रेस पक्ष पदाधिकारी कार्यकर्त्यांकडून अभिष्टचिंतन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने लातूर मध्ये दि.३१ ऑगस्ट (रविवार) रोजी दोन सामाजिक उपक्रम राबवित प्रांताध्यक्ष श्री हर्षवर्धन सपकाळ यांना निरोगी दिर्घ आयुरारोग्य लाभावे यासाठी अभिष्टचिंतन करण्यात आले.

पक्षाचे प्रांताध्यक्ष श्री हर्षवर्धन सपकाळ यांच्या वाढदिवसानिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय या ठिकाणी उपचारार्थ दाखल रुग्ण तसेच रुग्णांचे नातेवाईक यांच्याकरिता अन्नसेवा आयोजित करण्यात आली.ज्यामध्ये सर्व वर्गाच्या गरजू लोकांना उत्तम प्रकारचे भोजन देत पक्ष गरजू लोकांच्याकरिता सेवेत सदैव तत्पर आहे हे दाखवुन देण्यात आले.

यासोबतच रुग्ण, गरजू बेवारस आणि बेघर व्यक्ती यांना ब्लँकेट्सचे वाटप देखील करण्यात आले आणि आपण समाजाचे कांही देणे लागतो हा सामाजिक उद्देश डोळ्यासमोर ठेवून या सामाजिक,मानवतावादी उपक्रमाद्वारे समाजातील दुर्बल घटकांप्रती काँग्रेस पक्षाने नेहमीप्रमाणे यावेळी देखील सहानुभूती आणि मानवतावादी दृष्टिकोन दाखवून दिला.



यावेळी बोलताना लातुर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ड.किरण जाधव म्हणाले की,श्री सपकाळ यांचा वाढदिवस समाजाच्या सेवेसाठी समर्पित करण्याच्या संकल्पनेअंतर्गत हे कार्यक्रम राबविण्यात आले असून थंडीच्या दिवसांत बेघर गरजूना उबदार ब्लँकेट्सचा उपयोग होईल. आमचे नेते श्री.हर्षवर्धन सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष नेहमीच जनतेच्या सेवेसाठी वचनबद्ध आहे असेही ते यावेळी म्हणाले.

या निमित्ताने उपस्थित सर्वांनी पक्षाचे प्रांताध्यक्ष श्री. सपकाळ यांना दीर्घायुष्य आणि निरोगी आरोग्य यासाठी प्रार्थना केली आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्ष समाजसेवेचा हा मार्ग अविरतपणे चालवणार असल्याचे जाहीर केले.

यावेळी लातुर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव,प्रदेश काँग्रेसचे सचिव- ड.समद पटेल,माजी उपमहापौर कैलास कांबळे,सामाजिक कार्यकर्ते-मुस्तफा सय्यद,अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष- प्रा.प्रवीण कांबळे,सोशल मीडियाचे अध्यक्ष- प्रवीण सूर्यवंशी, माजी नगरसेवक असिफ बागवान, माजी नगरसेवक तबरेज तांबोळी, सामाजिक कार्यकर्ते मुस्तफा सय्यद,नितीन कांबळे,ड.गणेश कांबळे,पवनकुमार गायकवाड,अभिषेक पतंगे,करीम तांबोळी,किरण बनसोडे,अमोल गायकवाड,पिराजी साठे,नूतन हणमंते यांच्यासह लातुर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.



## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीला एक्सलंट मानांकन

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्मसी विभागाने पुन्हा एकदा यशाचा नवा झेंडा फडकावला आहे.महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांच्या शैक्षणिक मूल्यांकनात महाविद्यालयाला एक्सलंट हे सर्वोच्च मानांकन प्राप्त झाले आहे. एम.एस.बी.टी.ई.मुंबई मार्फत दरवर्षी अध्यापन पद्धती, शैक्षणिक उपक्रम, निकाल, औद्योगिक व हॉस्पिटल व्हिजिट्स, प्रयोगशाळा सुविधा, तज्ज्ञ व्याख्याने तसेच व्यक्तिमत्व व उद्योजकता विकास कार्यक्रम या विविध निकषांवर संस्थांचे मूल्यमापन केले जाते. या सर्वांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्मसी विभागाने सलग दुसऱ्यांदा एक्सलंट श्रेणी मिळवली आहे. या यशाचे श्रेय प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते आणि विभागप्रमुख प्रा. प्रकाश शिवनेचारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या परिश्रमांना जाते.

## पूरग्रस्त गावची काँग्रेस पक्षाचे नेते डॉ. अरविंद भातांब्रे यांनी केली पाहणी

**निलंगा/प्रतिनिधी :** निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी तालुक्यात व परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक नद्यांना पूर आला आहे. हातातोंडाशी आलेले सोयाबीन पीक पाण्यात गेले असून ढगफुटीसदर्श

पावसामुळे नाले -ओढे ओसंडून वाहून शेतातील पिकांसह मातीचेही प्रचंड नुकसान झाले आहे.

चिंचोडी, नदीवाडी व हंचनाळ परिसरात सोयाबीन, मूग, उडीद, ऊस या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, या सोबतच काही शेकऱ्यांच्या घरात व शेतातील गोठ्याचेही नुकसान झाले असून शेतकरी बांधवा मध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

आज निलंगा विधानसभा मतदार संघाचे काँग्रेस



पक्षांचे नेते डॉ.अरविंद भातांब्रे सकाळी चिंचोडी, नदीवाडी व हंचनाळ या गावात जाऊन पाहणी केली.

या वेळी निलंगा तहसिलादार श्री. प्रसाद कुलकर्णी साहेब यांच्या उपस्थितीत प्रशासनाशी समन्वय साधून आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्यात यावेत अशी शासनास मागणी करण्यात आली.

मागील दोन दिवसांपासून सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांचे जीवनमान विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या तिन्ही गावातील नागरिकांनसमवेत चर्चा करुन त्यांना धीर दिला, कसलीही अडचण असल्यास माझ्याशी संपर्क साधावा अशी विनंती केली.

या परिस्थितीत सर्व नागरिकांनी स्वतः लक्ष राहून आपली काळजी घ्यावयाची आहे. नदी, नाले, पूल ओलांडतांना विशेष काळजी घ्यावी असे आव्हान मी आपणांस करीत आहे.

## ज्योती अनंत महावरकर / कावळे सेट परीक्षा उत्तीर्ण

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणीज्य महाविध्यालय लातूर येथे कार्यरत प्राध्यापिका ज्योती महावरकर / कावळे या अतिषय प्रतिकूल परिस्थितीत, संसाराचा गाढा सांभाळत, कुटूंबाची जवाबदारी सांभाळत कॅम्पूटर सायन्स या विषयात सेट परिक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत अर्थिक परिस्थितीवर मात करत यशाची शिखरे पार करून यश मिळवल्या बद्दल समस्त ककय्या समाज महासंघाच्या वतीने समाजाचे जिल्हाध्यक्ष श्रीमंत कावळे,गणेश सावळकर, अप्पाराव कावळे,बालाजी कावळे, दिगंबर खरटमोल,अनंत महावरकर, केदारी सावळे गुरुजी, पत्रकार अनिल सावळे, नरसिंग महावरकर, प्रदिप कावळे, सिंधू कावळे,यांनी अभिनंदन केले आहे.



## टी.सी.हरवली आहे

योगेंद्र अंकुश जाधव रा. लातूर या नावाची लॉर्ड श्रीकृष्णा इंग्लीश स्कूल लातूर येथून मिळालेली सहावी पासची टी.सी. दि. १/७/२०२५ रोजी लातूर ते अहमदपूर बस प्रवासात हरवली आहे. जर कोणास मिळाल्यास ते आणून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**-योगेंद्र अंकुश जाधव**
द्वारा : अंकुश लक्ष्मण जाधव
रा. नाथ नगर, लातूर, मो. ९५४५६८६०९५

## मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, श्री धर्मवीर मीणा, यांच्या हस्ते कल्याण इलेक्ट्रिक लोको शेड येथे कवच प्रणालीयुक्त ५०वे लोकोमोटिव्हला हिरवा झेंडा दाखवून रवाना

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, श्री धर्मवीर मीणा, यांच्या हस्ते कल्याण इलेक्ट्रिक लोको शेड येथे कवच प्रणालीयुक्त ५०वे लोकोमोटिव्हला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले

मध्य रेल्वेतील ७३० लोकोमोटिव्हना पहिल्या टप्प्यात कवच प्रणाली बसविली जात आहे.

रेल्वे सुरक्षेला अधिक बळकटी देण्याच्या दिशेने मध्य रेल्वेने आणखी एक यश संपादन केले आहे. कल्याण इलेक्ट्रिक लोको शेडमध्ये ५०व्या लोकोमोटिव्ह (37335/WP-7) वर 'कवच' प्रणाली यशस्वीरीत्या बसविण्यात आली. या लोकोमोटिव्हला आज मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्मवीर मीणा यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. या प्रसंगी मुंबई विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री हिरेश मीणा, प्रधान मुख्य विद्युत अभियंता, श्री अनुप कुमार अग्रवाल आणि प्रधान मुख्य सिग्नल व दूरसंचार अभियंता, श्री एम. एस. उप्पल उपस्थित होते.

'कवच' ही स्वदेशी विकसित स्वयंचलित रेल्वे संरक्षण (ATP) प्रणाली असून, तिचा उद्देश रेल्वे सुरक्षेला अधिक सक्षम बनविणे हा आहे. ही प्रणाली सिग्नल पासिंग ट डेंजर (SPAD), गतीमर्यादेचा भंग आणि अपघात/धडक होण्याची शक्यता कमी करते. स्टेशन उपकरणे व लोकोमोटिव्हवरील ऑन-बोर्ड युनिट्स यांच्यातील रेडिओ लिंकद्वारे सिग्नलिंगची माहिती आणि लोकोमोटिव्हचे स्थान यांची देवाणघेवाण ही प्रणाली वास्तव वेळेत करते. या माहितीच्या आधारे मुव्हमेंट अथॉरिटी लिमिट्स आणि गती मर्यादा पाळल्या जातात, ज्यामुळे रेल्वेचे संचालन अधिक सुरक्षित व कार्यक्षम होते.

भारतीय रेल्वे, सुरक्षा व स्वयंचलन वाढविण्यासाठी 'कवच' प्रणाली मिशन मोडमध्ये लागू करत आहे. रेल्वे बोर्डाने प्रथम टप्प्यात मध्य रेल्वेच्या ७३० लोकोमोटिव्हवर 'कवच' बसविण्याची मंजुरी दिली असून, या कामासाठी चार उत्पादकांसोबत करार करण्यात आले आहे. - HBL (170), Kernex (278), Quadrant (276) आणि GG Tronics (6). मध्य रेल्वेच्या विविध लोको




शेडमध्ये हे बसविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे, जेणेकरून लवकरच मध्य रेल्वेतील सर्व लोकोमोटिव्ह या अत्याधुनिक सुरक्षा प्रणालीने सज्ज होतील.

५०व्या लोकोमोटिव्हवर 'कवच' प्रणालीचे बसविणे हे मध्य रेल्वेच्या सुरक्षित, विश्वासार्ह आणि कार्यक्षम रेल्वे संचालनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमधील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## गणेशोत्सव ..

गणेशोत्सव गौरवी
महाराष्ट्रा मान बिंदू
सामीलउत्सवी सर्व
शीख मुस्लिम हिंदू

नवीन प्रकारे मांडव
नको भलेरस्ते खोदू
लोक कल्याणकारी
सुरेख उपक्रम शोधू

पर्यावरण सत्व कळे
अशीचं घडावी जादू
पार्थिव छोटीशीमुर्ती
सामुहिक बसवू बंधु

डोळस हो महोत्सव
नको अंधश्रध्दाअधू
नाठाळ कार्यकर्ते ते
करे परंपरा तकलादू

श्रीहून व्हिआयपी ते
सेलिब्रिटीपुढारीभोंदू
उत्सवपार निर्विघ्नते
चला विघ्नहर्त्या वंदू

वर्गणी सक्ती नसावी
गैर कृत्यांस प्रतिरोधू
शुध्द हवेत कार्यक्रम
समाजमनास उद्बोधू

संस्कृती मोल अनन्य
काय जाणेलं निर्बोधु
दिशादर्शक देखावे ते
आबालवृध्दाअवबोधु

भ्रम पसरवे दिशाहीन
गुडघ्यात ज्यांचा मेंदू
गर्दीचाघेई गैरफायदा
कुणीउडाणटप्पूलडदू

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# संघर्षासोबत कल्याणकारी कार्यक्रम राबवण्याची आवश्यकता : कर्मयोद्धा अंबादास शिंदे

### बहुजन समाजातील सप्तरत्नांचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२५ उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** आज समाजामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येत आहे त्यात बहुजन समाजाच्या लोकांच्या समस्या ह्या अत्यंत महत्त्वाच्या आहे तसेच बहुजन समाज आज संघर्षामध्ये आपले जीवन जगत आहे त्यामुळे संघर्षासोबत कल्याणकारी कार्यक्रम राबविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोद्धा अंबादास शिंदे यांनी बोलताना व्यक्त केले.

स्वातंत्र्य, अस्मिता, स्वत्व आणि स्वाभिमान जपणारा सर्वोच्च प्राधान्य देऊन क्रांतिकारी जाणिवेतून कार्यरत असलेल्या भारतीय दलित पँथर महाराष्ट्र राज्याच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त निवडक बहुजन समाजातील सप्तरत्नांचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२५ नालंदा बुद्ध विहार, लातूर येथे नुकताच संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर स्वागताध्यक्ष रंजीतदादा आचार्य, मार्गदर्शक प्रा. बापू गायकवाड, प्रमुख पाहुणे प्रा. शिवशरण हावळे आणि प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. संजय गवई यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मनोज कुमार सूर्यवंशी, वैभव कीर्तीकर आणि जालिंदर कांबळे यांनी पुष्पाने, धुपाने आणि दीपाने पूजा करून विधायक पंचशील व बुद्ध वंदनेने करण्यात आली.

पुढे बोलताना कर्मयोद्धा अंबादास



शिंदे म्हणाले की, भारतीय दलित पँथरच्या माध्यमातून मागील पन्नास वर्षापासून मी बहुजनांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कायदेशीर आणि प्रशासकीय न्याय देण्याचे कार्य केले आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी चौदा कलमी कार्यक्रमाची निर्मिती केली होती त्याचा दुसरा टप्पा म्हणून महाराष्ट्रभर या चौदा कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे सुतवाच त्यांनी यावेळी केले. तसेच बहुजन समाजाने स्वकर्तृत्वाने आणि प्रसंगी संघर्षाने आपले भारतीय संविधानाने दिलेले अधिकार प्राप्त करण्यासाठी आज सज्ज राहिले पाहिजे. समाजातील मराठे आणि बहुजन यांचा अत्यंत निकटचा सहसंबंध असल्यामुळे भविष्यामध्ये भिमोत्सवा सोबत शिवोत्सव आपण सर्वांनी मिळून साजरा केला पाहिजे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी करून सुनील मांदळे संघर्ष योद्धा म्हणून सत्कार सुद्धा केला.

या गौरव सोहळ्यामध्ये लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना शिक्षणरत्न, चलो बुद्ध की और अभियानाचे प्रणेते डी. एस. नरसिंगे यांना धम्मरत्न, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूरचे विशेष सरकारी वकील ॲड. लक्ष्मण शिंदे यांना न्यायरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर, उपकेंद्र परिसर, धाराशीव येथील लोककला व नाट्यशास्त्र विभागाचे डॉ. गणेश शिंदे यांना नाट्यरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी पतसंस्था, लातूरचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सुनील कांबळे सहकाररत्न, बहुजन हिताय वस्तीगृह, लातूरचे अधीक्षक धम्माचारी कल्याण दस्सी यांना पालकरत्न आणि प्रबोधनकार डॉ. वैभवी कांबळे यांना प्रबोधनरत्न पुरस्काराने सम्राट अशोकाच्या राज मुकुटमनीची प्रतिकृती, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल आणि बुके देऊन यथोचित सन्मान करण्यात आला यावेळी सर्व सप्तरत्नांनी आपापली मनोगते व्यक्त केली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाच्या व गुणवत्तेच्या आधारे यशस्वी होता आले पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी प्रा. बापू गायकवाड यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाच्या आधारावरच आजचे ज्वलंत प्रश्न सुटण्यास मदत होऊ शकेल याची जाणीव करून दिली. प्रा. शिवशरण हावळे यांनी संघटनात्मक शक्तीचे महत्व अधोरेखित केले. पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष रंजीतदादा आचार्य यांनी कार्यक्रम आयोजनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली.

यावेळी कुटिल राष्ट्रव लघुपट दाखविण्यात आला आणि निर्माते डॉ. मारुती गंगावणे यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण पुरस्कार प्राप्त सुफी सय्यद शमशोद्दीन यांनीही मनोगत व्यक्त केले आणि त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघर्ष योद्धा सुनील मांदळे यांनी यावेळी स्फूर्ती गीत सादर केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्किल अकॅडमीचे संचालक सुरज मांदळे यांनी केले तर आभार संघर्ष योद्धा सुनील मांदळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. राहुल डोंबे, प्रा. विशाल लामतुरे, स्नेहा पोटभरे, सहदेव काका, नालंदा बुद्ध विहारातील सर्व संस्था पदाधिकारी, श्रीधर सुरवसे, मनियर यांनी सहकार्य केले

या कार्यक्रमाला लातूर शहरातील बौद्ध उपासक-उपासिका आणि बहुजन हिताय वसतिगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
८६०००२५०७०
९०२८३७६९६५
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६